
डॉ.बं.न.जाजू

# असंही एक
# रुक्मिणीहरण



# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# असंही एक रुक्मिणीहरण

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# असंही एक रुख्मिणीहरण

डॉ. बं. न. जाजू

# असंही एक रुक्मिणीहरण

**लेखक : डॉ. बं. न. जाजू**

पत्ता : पत्ता: डॉ. बं. न. जाजू
ए2/402, शिवरंजन टावर्स
सोमेश्वरवाडी, पाषाण, पुणे 411008
सम्पर्क: व्हाट्सॅप क्र. 8668553115
ई मेल bnjajooin@yahoo. co. in

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : २६ ऑगस्ट २०२२ (पोळा शके १९४४)

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. बं. न. जाजू



जन्म २७ सप्टेंबर १९४३.

डॉक्टर बंकटलाल जाजू यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील एका शेती आणि व्यावसायिक पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबात. एका लहानशा खेड्यात झाला. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण ग्रामीण भा्गात झालं. पुढे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथून बी. ई. (मेक्यनिकल ) आणि नंतर आय. आय. टी, मुंबई येथून एम. टेक. आणि पीएच. डी. पदव्या प्राप्त केल्या. 1966 ते २००१ असे पस्तीस वर्ष, महाराष्ट्र सरकारच्या तांत्रिक शिक्षण विभागात, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती, पुणे, औरंगाबाद, जळगाव येथे प्राध्यापक, विभाग प्रमुख, प्राचार्य अशा अनेक पदांवर काम केलं. त्यानंतर, जी. एच. रायसोनी इंजीनीरिंग कॉलेज, नागपूर येथे पाच वर्ष प्राचार्य आणि पुढे ह. व्या. प्र. मंडळ, अमरावती ह्यांच्या इंजीनीरिंग कॉलेज मध्ये, पाच वर्ष प्राचार्य म्हणून काम केलं. एक ख्यातीप्राप्त, विद्यार्थिप्रिय आणि आदरणीय प्राध्यापक व प्राचार्य.

डॉ. जाजू यांना महाराष्ट्र सरकारचा आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच इंडियन अचिव्हर्स फाऊंडेशन इंडिया चा शिक्षा भारती पुरस्कार प्राप्त. सी. वी. रमन अवॉर्ड फॉर एक्सलन्स इन इंजीनीरिंग अँड टेक्नॉलजी तसेच इंनस्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स इंडिया चा बेस्ट रिसर्च पेपर अवॉर्ड ही मिळाला. राष्ट्रीय आणि अंतरराष्ट्रीय स्तरावर ६५ टेक्निकल शोध प्रबंध प्रकाशित. युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया व पोर्तुगल मध्ये, शोध प्रबंध वाचन केलं तसेच काही सेशन ही चेअर केले.


डॉ. जाजू इन्स्टिट्यूशन ऑफ इंजींनियर्स इंडियाचे फेलो तसेच कंबशन इंस्टीट्यूट ऑफ इंडिया आणि ISTEI चे आजीवन सदस्य आहेत.


डॉ. जाजू अमरावती, नागपूर, बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात मेंबर ऑफ सिनेट, डीन ऑफ फॅकल्टि, मेंबर ऑफ ॲकडमिक कौन्सिल, मेंबर ऑफ बी, यू, टी. आर. , मेंबर ऑफ स्पेशल Examination कमिटी म्हणून काम केले। जीवनातील सर्व क्षेत्राशी जवळीक. साहित्य, नाट्य, संगित ह्यात विशेष रुचि. ते एक ख्यातीप्राप्त वक्ता असून त्यांनी आतापर्यंत जवळ जवळ १८० इन्व्हायटेड टेक्निकल Talks दिले आहेत.


-----------------------------------

ईसाहित्य प्रकाशित पुस्तके

फ़क्त एकदा क्लिक करा. उघडेल. वाचा.



आम्हा सर्व भावंडांसाठी अथक परीश्रम करणारे

माझे आई, बाबा, आणि काका

ह्यांना

# असंही एक रुख्मिणी हरण

# १

माझी ही लघु कादंबरी / दीर्घ कथा लिहायला सुरू करण्यापूर्वि ही कथा मला कुठून कळली, आणि कुठून हिची सुरवात करावी हे मला सांगावं लागेल. त्यासाठी, नुकत्याच 18 मार्च 2022 ला ई साहित्य प्रतिष्ठान ह्यांनी प्रकाशित केलेल्या, माझ्या " सुजनवाक्य " ह्या पुस्तकातील " तगमग " ह्या लेखाचा मला संदर्भ द्यावा लागेल. खरं म्हणजे त्या लेखाची मी जी सुरवात केली, तशीच सुरवात ह्या कहाणीची ही करावी असं मला वाटतं. ते करण्यापूर्वी मला इथे नमूद करयाचं आहे की ह्यातली सर्व नावं ही मुळची नसून मी ती सर्व बदलली आहेत. अगदी गावांच्या नावासह. 30 ऑक्टोबर 1984 ला मी माझं पीएच. डी.चं काम पूर्ण करून माझा थेसिस आय. आय. टी॰ मुंबई येथे सबमिट केला. सबमिट करून परत माझ्या प्रयोगशाळेच्या केबिनमध्ये मी बसलो, तेव्हा एकदम हलकं हलकं वाटायला लागलं. समाधानाच्या त्या आनंदानं, गेली तीन वर्ष दोन महिने मी रात्रंदिवस जे परिश्रम केले त्याचा परिहार झाला असं वाटलं. बरोबर 1 सप्टेंबर 1981 ला मी पीएच. डी. साठी आय. आय. टी. ला रुजू झालो. पहिले सहा महिने आय आय टी च्या नियमाप्रमाणे दोन क्रेडिट सेमिनार तयार करून सादर

करण्यात अन पीएच. डी. चा प्रॉब्लेम ठरवण्यात गेले. माझ्या गाईड डॉक्टर मिसेस पारीख होत्या. त्यांच्याशी बऱ्याच वेळा चर्चा केल्यानंतर माझा प्रॉब्लेम ठरला. मग काम कसं अन कुठून सुरू करायचं यासाठी च्या लिटरेचर सर्वे वर जवळ जवळ तीन महिने गेले.मग माझ्या प्रयोगाची आखणी आणि त्यासाठी लागणाऱ्या उपकरणांची जुळवाजुळव करून माझा प्रयोगाचा सेटप उभा करण्यात आणखी दोन महिने गेले. पण या सगळ्या प्रकारातून प्रत्येक पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्याला जावंच लागतं. तेवढा वेळ लागतोच. अगदी ठोकळ मानाने सांगायचं झालं तर डिझेल इंजिन एक्झॉस्ट कंट्रोल वर माझं पीएच. डी.च काम होतं. त्यात पहिले म्हणजे आधीचे आठ सोडून पुढचे सोळा महिने मी प्रयोगशाळेला रोज सहा तास डिझेल इंजिनवर प्रयोग करायचचो. सकाळी 9 ते 12 अन दुपारी दोन ते पाच साडेपाच पर्यंत. डिझेल इंजिन चालू करून त्या सेटवर उभा असायचो. त्यात वेगवेगळे प्रयोग करून सर्व रीडिंग घेणे हे रोजच काम असायचं. मग रात्री परत सात ते दहा अकरा पर्यंत प्रयोगशाळेतल्या खोलीत बसून संबंधित कॅलक्युलेशन्स वगैरे करुन पाहणे, हा भाग असायचा. ह्यात मध्ये मध्ये इंजिन मध्ये किंवा उपकरणांमध्ये होणारे बिघाड, दुरुस्ती, मग त्यांना परत सुस्थितीत आणणे,या सर्व बाबींचा अंतर्भाव होताच. असं करत करत जवळ-जवळ 28 महिने गेले. त्यानंतर मला माझ्या सर्व रिझल्टच^ अनालिसिस करून लिटरेचर मध्ये पहिल्या काही उपलब्ध असलेल्या

समीकरणांना मॉडीफाय करायचं होतं. त्यावर कॉम्प्युटर वरही बरीच मदत घ्यायची होती. मग कॉम्प्युटरचा अभ्यास हा योगायोगाने आलाच. मग सर्व इंटरप्रेटेशन्स, स्वतःच्या कामावर आधारलेले कन्क्लूजन, याची कच्ची टाचणं करण्यात बरेच दिवस गेले अन मग मी माझा थेसीस लिहिणं सुरू केलं. थोडं थोडं लिहून झालं की मी ते पारीख मॅडमना दाखवून त्यावर चर्चा करून फायनल लिहायला लागायचो. त्यात मी माझ्या कामावर जवळ जवळ 70 ते 80 वेगवेगळे ग्राफ काढले होते. ते सर्व समोर ठेवून चर्चा करावी लागायची. दिवसभर आणि रात्री अकरा वाजेपर्यंत मी डिपार्टमेंट मध्येच असायचो. असं करत करत शेवटी अडतीस महिन्यानंतर मी माझा थेसीस सबमिट केला. सहाजिकच हलकं हलकं वाटत होतं. एक तृप्तीचं, फलश्रुतीचं अतिव समाधान होतं.

ज्या दिवशी थेसीस सबमिट केला त्याच दुपारी घरी कॉर्टरवर आल्याबरोबर आमची सामानाची बांधाबुंद सुरू झाली कारण दुसऱ्या दिवशी आम्हाला आय आय टी सोडून अमरावतीला निघायचं होतं. अमरावती ला आल्यावर दोन चार दिवस घर लावण्यात गेले. मी खरं म्हणजे दुसऱ्याच दिवशी अमरावतीच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये माझ्या कामावर रुजू झालो. घर बहुतांशी माझ्या बायकोनं लावलं. घर लावून झाल्यावर जो शनिवार रविवार आला त्या शनिवारी रविवारी बायको, मुलांना घेऊन दोन दिवसासाठी माहेरी आर्वीला गेली. ती गेली त्या रात्री जेवण झाल्यावर बाहेर

मी झोपाळ्यावर बसलो आणि कसं कुणास ठाऊक मला माझ्या पहिल्या वर्गाच्या शिक्षणापासून पीएच. डी. पर्यंतचा शिक्षण प्रवास आठवला.

विशेष म्हणजे चौथा वर्ग पास झाल्यानंतर माझ्या घरचे लोक मला पुढे शिकवणारच नव्हते. सरळ सरळ घरच्या किराण्याच्या दुकानावरून बसवणार होते. ह्याची मला तिव्रतेनं आठवण झाली. माझं चौथीपर्यंत शिक्षण आमच्या तिन चार हजार वस्तीच्या खेड्यातच झालं. मी पहिल्या वर्षापासून नीट अभ्यास करून वर्गात नेहमी पहिला-दुसरा असायचो. चौथ्या वर्गात तर मी आमच्या चार-पाच खेड्यांच्या सेंटर मधून पहिला आलो. पुढे शिकायचं याचा मला सारखा ध्यास लागला होता. अतिशय तगमगत होतो मी. घरची परिस्थिती यथातथाच होती. त्यातल्या त्यात कसं बसं करून माझ्या मोठ्या भावाला पुढे शिक्षणासाठी माझ्या आत्याकडे पाठवण्यात आलं. आता माझी व्यवस्था आणखी कुठे करणार? दोन जणांचा खर्च ही घरचे करायला तयार नव्हते. माझे वडील म्हणाले "बस झालं तुझं शिक्षण' घरच्या किराण्या च्या दुकानावर बसत जा. आम्हालाही मदत होईल." मी माझं म्हणणं रेटत होतो. माझे काही वर्गमित्र तालुका-जिल्हयाला पाचवीत जाणार होते. मग मला रोज रडू यायचं. मी सारखा आईच्या मागे फिरायचो.

तसं म्हणजे माझ्या मामाच्या गावी आठवीपर्यंत शाळा होती. मामा श्रीमंत होते. घरही मोठे होतं. पण माझ्या वडिलांचं अन मामांचं आपसात

बनत नव्हतं. म्हणून मामाची विनंती करायला माझे वडील तयार नव्हते. मी आईला म्हटलं तू मामा ला विचार. मी निदान आठवीपर्यंत तेथे शिकतो. पुढचं पुढे पाहू. मी माझ्या ध्यासामुळे रात्री झोपेतून उठून बरळायला लागलो.' मला शिकायचं आहे, मला मामाकडे न्या' वगैरे. माझा एक मोठा चुलत भाऊ होता. त्याने एक दिवस माझ्या आईला समजावून सांगितलं की काकी तू मामांना विचार आणि याला त्यांच्याकडे पाठव शिक्षणासाठी. हा रात्री बरळतो. ह्याच्या डोक्यावर परिणाम होईल. शेवटी माझ्या मामाला विचारून, आणि माझ्या वडिलांची परवानगी घेऊन माझ्या आईनं मला पाचवीसाठी मामाच्या गावी नेऊन सोडलं. मला खूप आनंद झाला.

# २

दुसऱ्याच दिवशी मामानं शाळेत पाचव्या वर्गात माझा प्रवेश घेतला..मग मी रोज शाळेत जायला लागलो. आठ एक दिवस तिथे राहून माझी आई परत आमच्या गावी गेली. मी मामाच्या गावी स्थिर स्थावर होवून चांगला रूळल्या नंतर साधारणत: महिन्या दीड महिन्यानं एक दिवस, रात्री झोपतांना माझ्या मनात विचार आला ( मी त्यावेळी 12 वर्षाचा होतो) की आपण “ मला मामाच्या गावी शिकायला पाठवा असं सारखं आई-वडीलांच्या मागे लागलो तेव्हा बाबा सारखे नाही का म्हणत होते? ‘मला, तुला तिथे पाठवायचं नाही ‘ असं का म्हणत होते ? “ अन मग मला हेही आठवलं की मला थोडी जाण आल्या पासून मी बाबांना मामाच्या गावी गेलेलं कधी पाहयलंच नाही. इतकंच नाही तर आईही सातआठ महिन्यांपूर्वी फक्त एकदाच आम्हा तिन सर्वात लहान असलेल्या मुलांना घेऊन मामाच्या मोठ्या मुलीच्या लग्नात मामाच्या गावी गेली होती. असं का? कोणत्या कारणानं मामा अन माझ्या वडलांमध्ये बेबनाव होता? अन तो किती दिवसांपासून होता.? त्या बाल वयातही माझ्या ह्या प्रश्नांनी माझ्या डोक्यात काहूर माजवलं. दुसऱ्या दिवशी ही ह्या प्रश्नांनी माझा पिच्छा सोडला नाही.

मग मी ठरवलं की ह्याचा शोध आपण घेतलाच पाहिजे. आता शोध घ्यायचा म्हणजे घरातील कोणत्या तरी वडीलधाऱ्या व्यक्ति कडूनच हे कळण्यासारखं होतं. घरात सर्वात वडील व्यक्ति म्हणजे माझ्या आईची आई. मी तिला नानी म्हणायचो. नानी जवळजवळ 75-80 वर्षाची असावी. पण तशी टणक होती. दिवस भर घरात कोण काय करतं ह्याकडे तीचं लक्ष असायचं. मामाकडे शेती वगैरे खूप० म्हणून जनावरही खूप. गायी , म्हशी , बैल खूप होते. अगदी दोन गोठे भरून. तिन म्हशी अन दोन चांगल्या गायी होत्या. सगळं दूध-दुभतं मामी अन कामावर असलेली एक ब्ब्राम्हणी करायच्या. पण आजीला बसवत नव्हतं. त्या जातीनं ह्याकडे लक्ष द्यायच्या. मग रोजचं लोणी जमा करण, 3-4 दिवसानं ते लोणी कढवून-तापवून त्याचं तूप करण हे सर्व नानी करायची. एवढच नाही तर दिवसा आड झालेल्या घूसळणाचं अर्धा पिपा (मोठा डबा) ताक ती , ताक मागायला येणाऱ्यांना लोटा-दोन लोटे स्वत: वाटायची. मामाचं घर प्रचंड मोठं. दोन मजली. मोठा वडा, मोठी बैठक. बैठकीला लागून असलेलं किरण्याच दुकान. सर्व मिळून रोज रात्री दहा-बारा दारं बंद करायला लगायची. मामी, घरगडी, आम्ही मुलं ते रोज करायचो. पण झोपण्यापूर्वी, हातात कंदिल घेवून रोज नानी दारं व्यवस्थित बंद झाली आहेत की नाही ते तपासून पाह्यची. तिच्या त्या एवढ्या गुरफाटलेल्या दिनचर्येत ती मला कुठला वेळ देणार, अन सांगणार?

शिवाय वयाप्रमाणे तिला आलेली थोडी विस्मृती. तेव्हा नानीला विचारण्यात काही अर्थ नव्हता.

मामांचा तर आम्हाला एवढा दरारा अन धाक की त्यांच्या समोर उभं रहयची आमची ताकद नव्हती. घरात आम्ही चार मुलं होतो. मामाची मुलगी. ती माझ्यापेक्षा तिनेक वर्षानं मोठी. जवळजवळ माझ्याच वयाचा माझा मामे भाऊ. तो सहाव्या वर्गात होता. ही दोन्ही मुलं माझ्या पहिल्या मामींची. त्या तरुणपणीच वारल्या. त्यांच्या मोठ्या मुलीचं लग्न, मी तिथे गेलो त्याच्या सात आठ महिने आधीच झालं होतं. शिवाय घरात माझा एक मावस भाऊ ही होता. तोही माझ्या पेक्षा 2-3 वर्ष मोठा अन माझ्या सारखाच मामाकडे शिकायला आलेला. पहिल्या मामी वारल्या नंतर मामांनी दुसर लग्न केलं. ह्या दुसऱ्या मामी गरीब घरातून आलेल्या होत्या. दिसायला सुंदर होत्या. अत्यंत सुस्वभावी. माझा तंर खूप लाड करायच्च्या कारण मी एकटाच त्यांचा आज्ञा धारक अन त्यांनी सांगितलेलं काम करणारा होतो.

आमचा मामेभाऊ खूप हट्टी व लाडात वाढलेला. कारण ही आताची त्याची सावत्र आई. म्हणून नानी असो की मामा असो त्याचे फार लाड करायचे, हट्ट पुरवायचे. तो नव्या मामीचं तर काहीच ऐकायचा नाही उलट त्यांच्या खोट्या-नाट्या तक्रारी मामा व नानी कडे करायचा. मामा मग मामीला दाटायंचे. रागवायचे. तीच स्थिति मामे बहिणीची. माझा मावस् भाऊ ही श्रीमंतांचा मुलगा होता, तोही थोडा उलटूनच मामीला बोलायचा.

मग मामीला राहता राहिलो मीच. पण त्या खरंच मनापासून मला जीव लावायच्च्या.

मी गरीब घरचा म्हणून असेल कदाचित. पण त्यांना माझी खूप सहानुभूती होती, बरेच वेळा घरात काही लाडू, गोड-धोड बनलं की नानी अगोदर माझ्या मामे भावाला द्यायच्या मग आम्हाला. कधी कधी तर आम्हाला द्यायच्याही नाहीत. मग मामी त्यांना लपवून छपून मला ते खायला द्यायच्या. आमच्या मुला मुलांमध्ये कधी भांडण झाली तर माझी कड घ्यायच्या. माझ्या मनातही मामी बद्दल खूप आदर होता व प्रेम होतं. इतकं की पुढे मी 62-63 वर्षांचा असतांना त्या वारल्या तो पर्यन्त मी अन माझ्या बायकोनी, मुलांनी त्यांच्यावर आई सारखं प्रेम केलं .त्यांना आदर दिला. मी कोणत्याही गावी असलो तरी दरवर्षी सहकुटुंब दोन दिवस तरी मामीकडे जावून त्यांना भेटून यायचो. वयाच्या 90व्या वर्षी त्या वारल्या.

मी मामाच्या गावी शिकायला गेलो त्यावर्षी घरात मी वर सांगितल्या प्रमाणे आम्ही चार मोठी मुलं होतो अन नव्या मामींना त्यावेळी एक, दोन वर्षाचा मुलगा होता. (पुढ त्यांना चार मुलं झाली ) मला हवी असलेली माहिती मामीजवळ असण्याची काही शक्यताच नव्हती. बरं घरात असे कोणी जुने,म्हातारे घरगडीही आता कामाला नव्हते. हो पण मला ह्याबाबतीत सांगू शकणाऱ्या दोन वृद्ध व्यक्ति घरात होत्या. एक म्हणजे माझ्या दिवंगत मोठ्या मामाच्या विधवा पत्नी. माझ्या मोठ्या मामी. त्या

वयानं फार मोठ्या होत्या अन पायानं थोड्या अधू होत्या. आम्ही त्यांना लंगडया मामीच म्हणायचो. त्या बहुधा आजारीच असायच्या. त्यांची एक वेगळीच खोली होती. त्या फारशा बाहेर पडाच्या नाहीत किंवा कोणाला फारशा बोलायच्याही नाहीत. त्याही मला काही मदत करू शकतील असं मला वाटलं नाही. पण दुसरी वृद्ध व्यक्ति म्हणजे माझ्या मामांचे दोन पिढीतले काका. त्यावेळी त्यांचं वय 65-70 वर्ष असावं. त्यांना मामा, मामी मुरलीकाका अन आम्ही मुलं मुरलीदादा, मुरलीनाना असं म्हणायचो. गावातले लोक त्यांना मुरलीशेठ म्हणायचे. ते एकेकाळी फार श्रीमंत होते अन खरंच शेठ होते. त्यांचा किस्सा ही अजबच.

मी वर म्हटल्या प्रमाणे मुरलीनाना म्हणजे माझ्या मामांचे दोन पिढीतील काका हे एकेकाळी खूप श्रीमंत होते. म्हणजे मामाच्या पेक्षाही. त्यांच्याकडे खूप शेती होती. दोन मोठी माडीची घरं होती. बैल,गाई,म्हशी, घरगडी असा पसरा होता. त्यांना सख्खे भाऊ बहिणही कोणी नव्हते. नानी, म्हणजे त्यांच्या पत्नी ही चाळीस पंचे चाळीस वर्षाच्या असतांना वारल्या. ऐन उमेदीच्या वयात मुरलीनाना फार ऐश्वर्यात राहायचे. त्यांना अनेक शौक(षोक) होते. चांगले कपडे-लत्ते घालणं रोज अंगावर अत्तर शिंपडण त्यांना खूप आवडायचं म्हणे. एवढंच नव्हे तर ते शेतात किंवा बाहेरगावी जेव्हा बैल-दमणीने जायचे तेव्हा दमणीत अंथरलेल्या गादीवरही अत्तर शिपडावं लागे. नेहमी ऊच्च दर्जाची सिगारेट त्यांचा हातात असायची० पण

त्यांच्या दोन शौकांनी त्यांची बरबादी केली अन त्यांची इस्टेट धुळीला मिळवली; ते म्हणजे त्यांना असलेला सट्टा व जुगार खेळण्याचा नाद. ह्या नादाच्या ते इतके आहारी गेले की काही वर्षातच त्यांची शेती ,घरदार त्यांना विकावं लागलं. घरातले सर्व दाग-दागिने विकावे लागले. इकडे त्यांचं वयही वाढत होतं. वाढत्या वयात तर शेवटी शेवटी त्यांचे इतके हाल झाले म्हणतात की त्यांना राहण्याची, दोन वेळा जेवण्याची ही सोय राहिली नाही.

त्यांचे हे हाल बघवेनात तेव्हा माझ्या सख्ख्या नानी अन मामांनी मुरलीनाना ना आपल्या घरी राहायला बोलावलं. मामांच्या राहत्या घरच्या बैठकीला एक मोठा व्हरांडा होता. त्या व्हरांड्याच्या एका टोकाला भिंतीला एक मोठं कपाट होतं अन त्याच्या समोर एक साधारणत: 5 x 7 चा एक मोठा लाकडी दिवाण वं त्यावर एक जाडजूड गादी अंथरलेली असायची. मुरललीनाना ह्या कपाटात आपले कपडे व थोडसं समान ठेवायचे व दिवसभर ह्या दिवाणावर बसलेले असायचे। रात्री त्याच दिवाणावर झोपायचे. रोज आपलं पांघरूण घडी करून उशीच्या बाजूला ठेवायचे . त्यांची दिनचर्या ही ठरलेली असायची. प्रातर्विधी वगैरे आटोपून घाई घाईत काळ्या दंत मंजनानं दात घासून तोंड धुवायचे. मग नानी किंवा आम्हा मुलानपैकी कोणी त्यांना मोठा ग्लास भरून चहा बाहेरच आणून द्यायचो. त्यांचं बिडीचं व्यसन त्यांना होतंच. आता उच्च दर्जाच्या सिगारेटी पीण शक्यच नव्हतं. ते आता रोज ऊंट छाप बिडी प्यायचे (ओढायचे). ती मात्र

त्यांना वारंवार लागत असे. मग ते आम्हा मुलांना किंवा आमच्या किरण्याच्या दुकानाच्या मुनीमाला थोड्या थोड्या वेळानं बिडी मागायचे. सर्वांची आंघोळ झाल्या नंतर त्यांना सांगावं लागायचं की आंघोळ करून घ्या. आंघोळीचा त्यांना फार कंटाळा असायचा. कसं तरी आत जाऊन अर्धी अर्धी पाण्याची बकेट आंगावर ओतून चार मिनंटात बाहेर यायचे。 रस्त्यानं येणाऱ्या जाणाऱ्याशी नेहमी ते बोलत असत. 65-66 वर्षाचे असतील मी गेलो तेव्हा. पण तब्येतीनं चांगले होते. अर्धी आधीक जेवण झाली की त्यांना आत जेवायला बोलवायचे. आत येताना स्वयंपाक घरच्या जवळ येतायेताच जोरानं ओरडायचे “ बुढे, ( नानीला ते भाभी वगैरे काही न म्हणता नेहमी बुढे च म्हणायचे ), चार पोळया, तीन चार पळया वरण, अन् काय असेल ती एखाद-दोन चममचे भाजी एकदमच वाढून दे. मग ते वाढलेलं ताट घेऊन स्वयंपाकघराच्या बाजूला असलेल्या ओसरीत बसून , सर्व एकत्र काला करून 6-7 मिनिटात जेवायचे. दोन्हीही वेळा हा असाच जेवणाचा कार्यक्रम असायचा.

त्यांची दिनचर्या काही ठरलेली नसायची. ते बुध्धीनं खूप हुशार होते. अन त्यांचं हसताक्षर ही खूप छान होतं. आमचे मामा तेव्हा सावकारी करायचे. म्हणजे आडल्या नडलेल्यांना कर्ज देण, लोकांच्या वस्तु, भांडी, दागिने गहाण ठेवून त्यावर कर्ज देण, हा त्यांचा नित्याचा व्यवसाय होता. हे कर्ज देताना ते घेणाऱ्याकडून प्रोमेसरी नोट किंवा सविस्तर गहाण खत लिहून

घ्यायचे. हे सर्व लिखापडीचं काम मुरलीनांना करायचे. मग त्यांना प्रत्येकाकडून अन् थोडे मामाकडूनही लिखाई चे पैसे मिळायचे. ही त्यांची कमाई असायची. शिवाय त्यांचा पत्त्याच्या जुगाराचा नाद अजूनही त्यांना होताच. मामांचा डोळा चुकवून ते दोनचार तास गायब व्हायचे व जुगार खेळायचे. ते आज हरले की जिंकले हे आम्हाला ताबडतोब कळायचं. हरले की थोडा ओढवलेला चेहरा, मग थोडी चिडचिड , आम्हा मुलांना शिव्या असा प्रकार व्हायचा. अन् जिंकून आले की आल्या आल्याच किंवा आम्ही भेटू तेव्हा प्रत्येक मुलाला एकेक रुपया –आठ आणे द्यायचे व म्हणायचे ' जा. काही मिसळ, पेढे खाऊन या." मग आमची चंगळ असायची. माझ्याशी त्यांची फार गट्टी होती. कारण मी त्यांची सगळी कामं निमूटपणे करायचो. मामांचा किंवा मुनीमाचा डोळा चुकवून त्यांना बिडीचं पूर्ण बंडल द्यायचो.

# ३

अशा ह्या पार्श्वभूमित मला हवी असलेली माहिती, मुरलीनानांकडून नक्की मिळेल असं मला वाटू लागलं. एक दिवस मामा बाहेर गावी गेलेले होते. रविवार असल्यानं मलाही शाळा नव्हती. दुपारी जेवण झाल्यानंतर मी नानाना म्हणालो " आज पांढरीच्या शेतात चलता?" शेत गावखोरीला, जवळच होतं. ते म्हणाले चल. आज काही लिखापडीचं काम नाही अन् माझे खेळणारे मित्रही गावाला गेलेत. संध्याकाळ पर्यन्त शेतात फिरून येऊ." मला हीच संधी हवी होती.

मग दुपारी जेवण झाल्यानंतर बाराएक वाजता आम्ही दोघं शेतात जायला निघालो. त्यांनी मला दुकानातून 4-5 विडया आणायला सांगितल्या. मी मुंनिंमजींना विचारून त्यांना त्या दिल्या. आम्ही गावा बाहेर पडून शेताच्या पांदीच्या वाटेला लागलो. मी म्हटलं नाना ' मोठे मामा केव्हा वारले? अन ते एकच भाऊ होते का ह्या मामांना?" त्यांनी मग पहिल्यापासूनच सुरवात केली. म्हणाले ' अरे तुझ्या आईचे वडील गुलाबचंद. तुझ्या आईला एक मोठी बहीण होती राधा अन एक धाकटी शांता. तसेच तुझ्या आईचा मोठा भाऊ म्हणजे श्रीराम अन धाकटा भाऊ

म्हणजे हे आताचे तुझे मामा नारायण. तुझ्या आईला एकच काका होते, ते म्हणजे बिहारी. ह्या बिहारीला फक्त एकच मुलगी होती गीता. ती तुझ्या आईपेक्षा धाकटी होती. सर्व मुलींमध्ये दिसायला तीच सुंदर होती. तुझ्या आईचे काका-काकू लवकरच वारले. वारण्या पूर्वीच बिहारीनं, नारायण मामाला दत्तक घेऊन आपल्या वाट्याची सर्व इस्टेट नारायणाला देऊन माझ्या लग्नानंतर गीताची, तिच्या लग्नाची जबाबदारी नारायणची राहील असं सर्वांना सांगितलं होत. तुझे नाना अन मोठे मामा-श्रीरामहि फार काळ जगले नाहीत. अन अगदी तीशीच्या वयात कारभाराचा सर्व बोझा तुझ्या ह्या नारायण मामावर पडला. अर्थात, त्याआधी गीता सोडून, ह्या सर्व भावा-बहीणींची लग्न झाली होती. गीता दोन-तीन वर्षानंनातर वयात आली तेव्हा तुझ्या मामानं तिच्या लग्नासाठी मुलं शोधायला सुरवात केली.”

मी मध्येच म्हणालो ‘ नाना , माझे वडील कधीच मामाच्या गावी येत नाहीत, त्यांच्याशी बोलत नाहीत. मला कळायला लागल्यापासून मी किंवा आम्ही भाऊ-बहिणीही कधी मामाच्या गावी आलेलं मला आठवत नाही. फक्त आता, 6-8 महिन्या पूर्वी मामाच्या मोठ्या मुलीचं लग्न झालं, तेव्हा आई अन आम्ही धाकटी तीन मुलं आईबरोबर मामाच्या गावी आलो. अन आता त्यानंतर 7-8 महिन्यांनी मी इथे शिकायला आलोय. नाना, मला एक सांगा, मामाचं अन माझ्या वडिलांचं काही भांडण झालं होत का? किती

वर्षापासून ते एकमेकांकडे जातयेत नाहीत, बोलत नाहीत ?अन आईही यायची नाही का मामाकडे? किती वर्षांपासून हे असं आहे ? “

तो पर्यन्त आम्ही शेतात पोहचलो होतो. मग आधी विहरीवर जाऊन पाणी प्यालो अन एका मोठ्या आंब्याच्या झाडाखाली सावलीत जाऊन बसलो. मी परत माझ्या प्रश्नांची सरबत्ती सुरू केली.

नाना म्हणले “ अरे बेटा ते एक मोठं महाभारत आहे. काय करशील ते ऐकून? “

मी म्हणालो “ नाना सांगाच मला. मला सगळं माहित करून घायचय. अन तुमच्या शिवाय मी आणखी कोणालाही हे विचारू शकत नाही “.

नाना मग झाडाच्या बुंध्यावर डोकं ठेऊन आडवे झाले अन म्हणले “बैस असा. मी आता तुला सगळी कथा सांगतो. त्या आधी मला एक बिडी पिऊ दे.” नानांनी मग बिडी पेटवली अन ती ओढत-ओढत सांगायला सुरवात केली. ते म्हणाले---

“ मी मघा तुला संगीतलंन, की गीता वयात आली तसं तुझ्या मामानं तिच्यासाठी वर संशोधन सुरू केलं..त्याची ती सर्वात मोठी जबाबदारी होती. त्या काळी साधारणत: लग्नासाठी मुलगा किंवा मुलगी शक्यतोवर आपल्या नात्यातलीच पाहयचे. त्यामुळे मुला-मुली बद्दल अन होणाऱ्या

व्याह्याच्या परिवारबद्दल आधीच माहिती असायची. मग पुढची काळजी नसायची. अगदी नाहीच नात्याातती मिळाली तर कोणी मित्रांनी किंवा ओळखीपाळखीच्यांनी सुचवलेलं नातं लोक आधी विचारात घेत. त्यादृष्टीनं तुझा मामा खूप भाग्यवान होता. कारण त्याच्या दोन्हीही मोठ्या बहीणींचे दीर लग्नाचे होते. एक म्हणजे तुझे काका अन दुसरे म्हणजे तुझ्या मोठ्या मावशीचे दीर. बरं दोन्हीही मुलं दिसयायला चांगली, सुस्वभावी होती हे सर्वांना माहीत होतं. आणि दोन्हीही कडून होकार येण्यासारखा होता. कारण तुझी ही चुलत मावशीही, दिसायला चांगली व सुस्वभावी होती.

मग मामानं अगोदर तुझ्या गावाला जाऊन तुझ्या काकांना मागणी घातली अन मुलगी पाह्यला यायची , तुमच्याकडच्यांना विनंती ही केली. त्याप्रमाणे काही दिवसातच हा मुलगी पाहण्याचा कार्यक्रम आटोपला. तुमच्या घरच्या लोकांनी आपला होकार ही कळवला. इकडे मामाकडे, सर्वांचं मत पडलं की एकदा मोठ्या मावशीच्या दिरालाही पाहून यावं व पसंत पडल्यास त्यांनाही मुलगी दाखवून द्यावी. त्यांचाही होकार आला तर पुढे विचार करून कुठे लग्न पक्कं करायचं ते ठरवता येईल. मग त्याप्रमाणे त्या मंडळीलाही बोलवण्यात आलं. त्यांनाही मुलगी पसंत पडली अन त्यांनीही आपला होकार कळवला.

आता तुझ्या मामाची, आजीची, मोठ्या मामीची, सर्वांची चर्चा सुरू झाली. अन त्या सर्वांमते ठरलं की तुझ्या मावशीच्या दिराशी लग्न ठरवावं. खरं म्हणजे तुझ्या काकांपेक्षा हा मुलगा दिसायला थोडा डावाच होता. पण ह्या लोकांच्या घरची परिस्थिति तुमच्यापेक्षा चांगली होती. तशी दोन्हीही घरं सुस्थितीत होती. कदाचित ह्याकारणामुळे किंवा कशामुळे, मामांकडच्यांनी तुझ्या मावशीकडच्यांना होकार कळवून तिथे हे लग्न पक्कं केलं. त्याप्रमाणे मग काही दिवसांनंतरचा मुहूर्त वगैरे काढून लग्नाची तयारी सुरू झाली.

पुढे खूप वर्षानंतर आम्हाला जे तुझ्या आईकडून कळलं त्यावरुन आता मी तुला पुढचं सांगतो आहे. सगळा मोठा मजेदारच किस्सा आहे .”

एवढं सांगून नाना अन मी परत विहिरीवर जावून पाणी प्यालो. मग परत नानांनी एक बिडी काढून चेतवली व ती ओढत ओढत परत झाडाखाली येवून बसले.

मी म्हटलं, “ नाना पुढे काय झालं मग ? ते म्हणाले ‘सांगतो ‘ अन मग परत त्यांनी सांगणं सुरू केलं.---------

“अरे ,व्हायचय काय? सर्व आजूबाजूच्या गावात अन सर्व नातेवाईकांना कळलं की गीतेचं लग्न तुझ्या मोठ्या मावशीच्या दिराबरोबर ठरविण्यात आलं आहे. महिन्याभरच्या आतला लग्नाचा मुहूर्तही निघाला

आहे. अर्थात ही बातमी तुझ्या घरच्या सर्वांना अन तुमच्या नातेवाईकांनाही समजली. तुझ्या आईची फार इच्छा होती की गीता आपली जाऊ म्हणून यावी. तशी तुझी आई तुझ्या काकांना चिडवायलाही लागली होती. आपला मुलगा दिसायला जास्त चांगला आहे तेव्हा आपल्याला नक्कीच होकार मिळणार असा तुमच्याकडच्या सर्व मंडळीचा कयास होता. पण झालं भलतंच. त्यामुळे तुझे आई-वडील फार नाराज झाले. तुझ्या काकांनी तर ते फारच मनाला लाऊन घेतलं. लग्नाची तारीख जसजशी जवळ येऊ लागली, तसतशी त्यांची अस्वस्थता वाढली. अशातच एक दिवस तुझी आत्या अन तिचे यजमान, म्हणजे तुझे आतोबा तुमच्या घरी 2-4 दिवसाठी आले. तुझ्या आतोबाचं नाव खुशालचंद असं होत. ते घरचे खूप श्रीमंत होते. खूप थाटामाटात राहयचे. त्यांच्या गावातही त्यांना एक वजनदार व्यक्ति म्हणून ओळखत. ते फार जिद्दी व मानभावी होते. आपल्या मनाविरुद्ध काही झालेलं त्यांना खपत नसे. बरं, ते तुझ्या मामाच्या गावच्या भागातले होते. त्यामुळे सर्वांना त्यांचा हा स्वभाव माहित होता.

# ४

ते तुझ्या आतेबरोबर जेव्हा तुमच्या गावी आले तेव्हा, अर्थातच ह्या सोयरीकिविषयी अन ल्ग्ना विषयी त्यांना सर्व कळलं. ते खूप दुखावले अन डिवचल्या गेले. खूप अस्वस्थ झाले. कसंही करून हे लग्न मोडून लीलाधरशी, म्हणजे तुझ्या काकांशी हे लग्न झालंच पाहिजे असे विचार त्यांच्या डोक्यात सारखे येऊ लागले. एक दिवस त्यांच्या डोक्यात एक फार खतरनाक योजना आली. त्या रात्री त्यांनी आईला वगळून बाबा, काका, तुमचा एक चुलत भाऊ-राधूसेठ ह्यांची एक बैठक घेतली. “

एवढं बोलून नाना थांबले. हा माझा चुलत भाऊ , राधूसेठ, हा जवळजवळ माझ्या वडलांच्या वयाचा होता. तो फार उपदव्यापी अन लांड्यालबाड्या करण्यात पटाईत होता. विशेषत:, आमचं कधी चांगलं व्हावं असं त्याला वाटत नसे. आमच्या घरच्यांना त्रास झाला, ते अडचणीत आले की त्याला खूप आनंद व्हायचा. अशा संधीच्या तो शोधताच असायचा. त्यामुळे आतोबांच्या ह्या बैठकीला तो आवर्जून हजार होता.

नाना पुढे सांगू लागले “ रात्री खलबतं सुरू झाली. तुझे वडिल अन काका हे फार सरळमार्गी होते. ते कधीही कोणाच्याही भानगडीत पडत

नसत. किंवा गावात कोणाला फालतूचे सल्ले वगैरे देत नसत. पण ह्या दोन्हीही भावांवर तुमच्या आतोबांचा खूप पगडा, प्रभाव होता. ते कसंही करून बाबा-काकांना त्यांची गोष्ट पटवून द्यायचे व आपल्याकडे त्यांची मनं ओढून घ्यायचे. त्या रात्रीच्या ह्या खलबतात आतोबा म्हणाले ‘मुलीवाल्यांनी आम्हाला नकार देवून आमचा अपमान केला आहे. आमचा लीलाधर त्या मुलापेक्षा दिसायला चांगला आहे. आपलीही परिस्थिति चांगलीच आहे. असं असतांना त्यांनी, आपल्याकडे न जुळवता, त्यांच्याकडे संबंध जुळवावा हे आपल्यासाठी अतिशय अपमानास्पद आहे. ह्या बद्द्ल त्यांना धडा शिकवलाच पाहिजे.”

तुझे वडील म्हणाले ‘ पण आता आपण करणार तरी काय, अन लग्न ही 10 दिवसांवर आलंय.”

मग आतोबांनी सर्वांना त्यांची योजना सांगितली. ते फार चतुर अन कुरापती डोक्याचे होते. जोडीला श्रीमंती, गावात मान. त्यामुळे एक प्रकारची मग्रूरी होतीच त्यांच्या अंगी. ते म्हणाले ' आपण नवऱ्या मुलीला लग्ना आधीच पळवून आणू आणि रातोरात तिचं लग्न लीलाधरशी लावून टाकू. एकदा लग्न झालं की काय करणार आहेत ते. मुकाट्यानं त्यांना स्वीकारावंच लागेल.'

सगळे ओरडले 'हे फार धोक्याचं काम आहे. आपण पकडले जाऊ शकतो. वर समाजात् बेइज्जती होईल ती वेगळी. कुठे तोंड दाखवायला जागा राहणार नाही"

खुशाल आतोबा खूप बिघडले. म्हणाले "आपला एवढा आपमान झाला असतांना चूप बसायचं ? मग बांगड्या भरा हातात. नामर्द आहात तुम्ही सारे. आमचा चुलत भाऊ राधूसेठही आतोबांना सामील झाला. आपण मुलगी पळवून आणून लीलाधरशी तीचं लग्न लावून दिलंच पाहिजे. जे होईल ते होईल. पुढे पाहता येईल. मग त्या दोघांनी ही कल्पना , तुझ्या वडलांच्या अन काकांच्या डोक्यात भरवून दिली. ते तसेही साधेच होते, म्हणून आतोबा आणि राधूसेठ समोर त्यांना नमतं घ्यावंच लागलं. मग हे नवऱ्या मुलीचं हरण कसं करायचं त्यावर सविस्तर खलबतं सुरू झाली.

आतोबांनी बराच विचार आधी करून ठेवला होता. खुशालसेठ म्हणाले ' ह्या सगळ्या धाडसामध्ये आपल्याला काशीची (तुझ्या आईची) खूप मदत लागणार आहे. तेव्हा तिला ही सगळी योजना सांगून , तिला विश्वासात घेणं अतिशय महत्वाचं आहे. ह्या सगळ्या प्रकारात काशीचा रोल फार कठीण अन महत्वाचा आहे. तिला काय काय करायचं हे आधी समजावून सांगावं लागेल व काहीही झालं तरी हे सर्व अतिशय गुप्त ठेवायचं, कोणालाही काहीही सांगायचं नाही हे तिला बजावून सांगावं लागेल. कारण

तिच्या वरच ह्या पलायनाची, हरणाची सर्व मदार आहे. ती थोडीही चुकली तर सगळं ओमफस होईल व आपण सर्व खूप अडचणीत येवू.'

नाना पुढे म्हणाले " मग आतल्या खोलीतून त्यांनी तुझ्या आईला बैठकीत बोलावलं. थोडं थोडं आईच्या कानावर पडत असल्यानं तिला पुसटशी कल्पना आली होतीच. ती लटतपटच बैठकीत आली. आतोबांनी अन सर्वांनी तिला आधी शांत व्हायला सांगितलं. काहीही घाबरायचं कारण नाही असं सांगितलं. आई काही केल्या पाय धारिना. तिला हा खेळ मोठा धोकादायक आहे असं मनोमन वाटू लागलं. व अशानं तर मी माझ्या माहेरलाच हरवून बसेन असं तीनं सांगितलं.' तसं काहीही होणार नाही व थोड्या दिवसात सर्व पूर्वी सारखं सुरळीत होईल असं आतोबा अन राधूसेठ परत परत आईला समजावू लागले. मग आइनं एकदाचा होकार दिला. (तीच्याही मनात हे होतंच की गीता आपल्या दिराची बायको अन आपली धाकटी जाऊ झाली पाहिजे.)

मग आtतोबांनी आपली योजना सविस्तरपणे समजावून सांगायला सुरवात केली. ते म्हणाले '—हे पहा आता लग्न आठ-दहा दिवसांवरच आलं आहे, तेव्हा काशीला माहेरी घेऊन जाण्यासाठि एक दोन दिवसातच तिच्या माहेरून कोणीतरी येईल. तिला एकटीला त्यांच्या बरोबर पाठवून द्या. काशी तू तिथे गेल्यावर नेहमी सारखंच मजेत राहायचं. लग्नाच्या दोन दिवस आधी नवऱ्यामुलीला हळद लागणार आहे. मग त्या मुलीला फारसं

एकडे तिकडे जाऊ देत नाहीत. हळद शुक्रवारी लागणार आहे. तेव्हा त्याच्या आदल्या दिवशी म्हणजे गुरुवारी संध्याकाळी सूर्यास्ताला काशी, गीतेला घेऊन गावाच्या बाहेर परसाकडेला येईल. (त्यावेळी खेडेगावात घरी संडास नसायचे. त्यामुळे सकाळ संध्याकाळ किंवा इतरही वेळी कोणालाही परसाकडला जायचं असलं तर आपआपल्या हातात पाण्याचा लोटा भरून,तो घेऊन गावाच्या बाहेर जावं लागायचं. ह्यासाठी पुरुषांची एक दिशा अन स्त्रियांची दुसरी दिशा ठरलेली असायची. साधारणत: स्त्रिया एकट्या जात नसत एक दोन जणी बरोबर-बरोबरच जायच्या.) म्हणून गीता मावशीला बरोबर घेऊन तुझ्या आईन गावाबाहेर यायचं असं तुझ्या आतोबांनी खूप हुशारीनं सुचवलं. तुझी आई लहानपणापासूनच खूप हुशार होती अन हिम्मतीची होती . तुझ्या नानांची तर ती फार लाडकी होती. कारण ती कसलाही हिशेब करून ताबडतोब उत्तर द्यायची.

खुशालसेठ-तुझे आतोबा पुढे म्हणाले ‘ काशी आम्ही तीन चार जण एक मोठी बैलांची दमणी घेऊन आधीच तिथे बाजूला राहू. तू आम्हाला पहिलं की परसाकडला बसायला म्हणून रस्त्याचा खाली झुडपात चालायला लाग. तसंच गीता ही करेल. मग आम्ही तिला ऊचलून दमणीत बसून पळून जाऊ. तू तशीच पण हळू पावलांनी रडत रडत घरी परत जायचं. घरी गेल्यावर तुझ्या आईला रडत रडत हे सांगायचं की गीतेला कोणी तरी दमणीत बसवून पळवून नेली म्हणून. सर्व तुझ्या भोवती जमा होऊन तुला

खोदून खोदून विचारतील की कोण होते ते लोक,किती जण होते, दमणी, बैल कसे होते, कोणत्या दिशेला गेले ते लोक, असे बरेच प्रश्न तुला सर्वजण विचारतील. तू रडत रडत ‘मला काहीही माहीत नाही असं पुन्हा पुन्हा सांगत राहयचं. फारच रागावले कोणी तर म्हणायचं मी खूप घाबरून पळत सुटले. सारखं रडत होते. मला मागे वळूनहि पाहयची भीती वाटत होती. खरच मला काहीही माहीत नाही असं तू सारखं सांगत राहायचं.’ नाना म्हणाले, “ अशा तऱ्हेनं तुझी आई ह्या पलायनात सहभागी झाली.

# ५

मग तो ठरलेला गुरुवार उजाडला. ठरल्या प्रमाणे तुझे आतोबा, वडील, काका अन राधूसेठ ह्यांनी एक चांगल्या खिलाऱ्या बैलाची दमणी घेतली अन दुपारी लवकरच निघून ते नियोजित स्थळी थोडं सूर्यास्तापूर्वीच पोहचले. दमणी रस्त्याच्या एका कड्याच्या खाली बाजूला लावली व तुझ्या आईची व गीतेची वाट पाहू लागले.

ईकडे संध्याकाळी ठरल्या प्रमाणे तुझ्या आईनं गीतेला परसाकडला माझ्या बरोबर चल असं प्रेमानं म्हटलं. गीता तयार झाली. मग दोघींनी आपापले लोटे भरून घेतले अन निघाल्या. गावाच्या थोड बाहेर गेलं की त्यांची नेहमीची जागा आली. थोडी डाव्या उजव्या बाजूला झाड-झुडुप सुरू झाली तसं तुझ्या आईला ती दमणी व तुमची माणसं दिसली. त्या दोघी बहिणी एकमेकांपासून थोड्या दूर बसायला गेल्या , तेवढ्यात , आधी ठरल्याप्रमाणे राधूसेठ आणि खुशालसेठनं गीताला उचलून दमणीत बसवलं व दमणी धाऊ लागली. गीता मोठमोठ्यानं ओरडायला लागली तसं कोणीतरी तीचं तोंड रुमालानं बंद करून टाकलं असावं.

ती दमणी पुढे कुठे जाणार होती हे तुझ्या आईलाही माहीत नव्हतं. तुझी आई रडायला लागली. आता खरी तिच्या अंगात भीती भरली. तिला रडायला खरंच येऊ लागलं पण रचलेलं नाटकही निभावण जरुरिचं होतं. ती तशी रडत रडत घरी येऊन तिच्या आईच्या गळयात पडून ओक्साबोक्षी रडू लागली. मामी वगैरे सर्व जवळ आल्या. तुझ्या नानीनं ओरडून विचारलं 'अग काय झालं ते सांगशील की नाही?' मग रडत रडत तुझ्या आईनं सांगितलं की गीताला कोणी तरी गावाबाहेरुन पळवून नेलं. तुझ्या आईला सर्वांनी खोदून खोदून विचारलं की कोण लोक होते? किती जण होते? घोड्यावर होते का?आई एकच संगत होती की दमणी होती. घोडे नव्हते. बाकी तिला काहीही कळलं नाही. तिनं सांगितलं की ती खूप घाबरून घराकडे पळत सुटली. तिनं मागे वळून ही पहिलं नाही. तेवढ्यात घरची पुरुष मंडळी,मामा जमले.

कोणी तुझ्या आईला दाटत होतं. नानीनं तर तिच्या एकदोन थोबाडत मारल्या. पण तुझी आई काहीच सांगत नव्हती. मला काहीच माहीत नाही हेच तीचं एक वाक्य सारखं सुरू होतं. वातावरण गंभीर झालं होतं. ताबडतोब दोन-दोन गडी माणसं हातात काठ्या घेऊन वेगवेगळ्या दिशेला शोधासाठी पाठवण्यात आली. सर्वांना असं वाटलं की काशीला हात नं लावता फक्त नवऱ्या मुलीलाच त्यांनी उचललं ह्याचा अर्थ त्यांना तिच्या अंगावरचे दागिने हवे असतील. गीतेच्या अंगावर एक सोन्याची चेन, एक

अंगठी आणि दोन्ही कानात सोन्याच्या बाळया होत्या. पण चोर किंवा दरोडेखोरांना तेवढं ही पुरे होतं. कोणी म्हणाले तिच्या अंगावरच सर्व सोनं काढून घेऊन ते गीतेला वाटेवरच कुठे सोडून देतील. मग त्या दृष्टीनं तपासच्या हालचाली सुरू झाल्या. काही गावातली माणसं मदतीला आली. सर्व कोलाहलच माजला. कोणाला काही सुचेना. बायकांची रडापड सुरू झाली. लग्न तिन दिवसांवर आलेलं. सर्व चिंताग्रस्त झाले.

मग गावातल्या काही जाणकारांनी मामाला सांगितलं की आपला शोध चालू द्या, पण तालुक्याच्या गावी जावून पोलिस स्टेशन मध्ये रीतसर व सविस्तर तक्रार नोंदविलीच पाहिजे. ह्यात बदनामीचाही भाग होताच पण हे करण ही आवश्यक होतं. मग ह्या गोष्टीवर थोडा विचार करून दोन जबाबदार व्यक्तींना तक्रार नोंदवण्यासाठी तालुक्याच्या गावी पाठविण्यात आलं. त्या दोघांमध्ये मी एक होतो.

“आता ईकडे तुमच्याकडील मंडळीनं काय केलं ते आधी सांगतो. अर्थात हे सगळं आम्हाला पुढे हळूहळू कळत गेलं. त्या ऐकिवाचे धागे दोरे जुळवूनच मी तुला हे सांगतो आहे. काही गोष्टी मी प्रत्यक्ष पाहिल्या ,काही मी नंतर ऐकल्या. “ एवढं बोलून नाना थोडे थांबले.

आधी मुरली नानांचा परिचय करतांनाच मी सांगितलं होतं की नाना खूप हुशार होते आणि त्यांना क्रमवार लिहाण्याची हातोटी होती. म्हणूनच

ते मामांच्या प्रोमेसरी नोट्स, गहाण खतं तर लिहायचेच पण गावात कुठेही खरेदी-विक्री, कैफियत चे कागद पत्र लिहायचे असले की मुरलीनानांना लोक बोलवायचे. त्यामुळे मला हे सर्व महाभारत सांगतांना नाना ते बरोबर आठवून, मनात योजून मला सांगत होते.

ते पुढे म्हणाले, “ तुमच्या अन आमच्या ह्या गावात दहा कोसंच अंतर होतं. म्हणजे आताचे तुमचे 35 -40 किलोमीटर समज. तुझ्या आतोबांच गाव आमच्या गावपासून थोडं जवळ, म्हणजे 30 एक किलोमीटर अंतरावर होतं. त्यामुळे तुझ्या आतोबांच्या योजनेत असं ठरलं होतं की एकदा नवरी मुलगी हाती आली की सपाट्यानं दमणी हाणून लवकरात लवकर आतोबांच्या गावी पोहचायचं. तिथे पोहचेपर्यंत रात्रीचे10-11 वाजणार होते. म्हणजे गावात तशी सामसूमच राहणार होती. आतोबांनी त्यांच्या घरच्या लोकांना सांगून आधीच लग्नाची सर्व तयारी करून ठेवली होती. म्हणजे नवरा-नवरीचे कपडे, पूजेच समान, होम-हवनाचं समान हे सर्व. इतकंच नाही तर लग्न लावण्यासाठी अन होम-हवनासाठी एक ब्राम्हणही बोलावून ठेवला होता. आतोबांच्या घरी असलेल्या बऱ्याच घरगड्यापैकी 2-3 जणांना गावच्या गढीच्या बुरुजावर हातात काठ्या वगैरे घेवून उभं केलं होतं. एकूण ते चांगल्या तयारीत होते.

त्यांची दमणी त्या सर्वांना घेवून बरोबर त्यांच्या सुनियोजित वेळेवर त्यांच्या दारी पोहचली. लागलीच नवरदेव –नवरीला आंघोळ घालून त्यांचे

कपडे नेसवण्यात आले. थोडसं खाऊन पिऊन लागलीच पुजा, अंतरपाट वगैरेनं लग्न लाऊन होमा साठी बसवण्यात आलं. ब्राम्हण घाई-घाईन मंत्र वगैरे म्हणूनं सर्व आटोपतं घेत होता. त्याला आधीच तसं सांगण्यात आल होतं.

एकदाचं लग्न उत्तर-रात्रीला लागलं. मग जेवण वगैरे करून थोडा वेळ विश्रांति घेऊन, दुसऱ्या मार्गानं तुमच्या गावी जायचं असं ठरलं होतं. आल्या मार्गानं जाण धोक्याचं होतं. कारण एव्हाना सर्व बोंबाबोंब झाली असेल हे सर्वांना माहित होतं॰ तो प्रवासही सर्वांनी एकत्र न करता काहींनी दमणीनं तर काहींनी बस, मोटर बदलत बदलत गावाला पोहचायचं असं ठरलं होत."

नाना म्हणाले – "-आता इकडे मामाच्या घरी काय चाललं होतं ते आधी तुला सांगतो. मी आधी सांगितल्याप्रमाणे मामाच्या घरून दोन-दोन माणस हातात काठ्या वगैरे घेऊन वेगवेगळया दिशेनं शोधासाठी पाठविण्यात आली होतीच मग काही जाणकार लोकांच्या सलल्याप्रमाणे दोन जबाबदार माणसं तालुक्याच्या गावी पोलिस स्टेशन मध्ये पाठविण्यात आली. त्यांनी(आम्ही) तिथे जाऊन रीतसर सविस्तर तक्रार नोंदवली. तेव्हा उत्तर रात्र झाली होती. पण पोलिसांनी सांगितलं की आम्ही शोध सुरू करतो व इतर पोलिस स्टेशनला ही कळवून ठेवतो. उद्या आमचे पोलिस तुमच्या घरी विचारपूस करण्यासाठी येतील.

पण पोलिसांनीही अंदाज काढला की नवऱ्या मुलीच्या अंगावरचे दागिने लुबाडण्यासाठीच मुलीला कोणीतरी ऊचलून नेलं असावं. तपासाला गेलेल्या गावच्या माणसांचाही तोच अंदाज होता. त्यामुळे त्यादृष्टीनं तपास सुरू झाला. सकाळपर्यंत कुठे काहीच पत्ता लागला नाही. सकाळ झाल्यानंतर दोन पोलिस मामांच्या घरी आले. सर्वात आधी त्यांनी तुझ्या आईला, तुम्ही दोघीच बरोबर होत्या का, किती दूर गेलात, कुठे तिला उचलून नेलं, किती माणसं होती, दमणी होती की गाडी होती, कोणी घोड्यावर होतं काय, कोणत्या दिशेला ते पळाले असे अनेक प्रश्न विचारले. तुझी आई रडत रडत सारखं हेच सांगत होती की मला काहीच माहीत नाही. मी खूप घाबरून गेले होते व मी पळत सुटले. मागे वळूनहि पाहिलं नाही. ते साहजिकच होतं. सर्वांना बरोबरच वाटलं. पोलिसांनी मात्र तक्रारीत दिलेल्या वर्णनाप्रमाणे , आम्ही इतर जवळच्या अन लांबच्या पोलिस स्टेशनांनाही ही कळवलेलं आहे असं सांगितलं. तुमच्या माणसांना काही शोध लागला तर आम्हाला ताबडतोब कळवा असंही त्यांनी सांगून ठेवलं. घरातली सर्व मंडळी चिंतेत होतीच.

# ६

इकडे तुमच्या कडचे दोन ग्रुप ,एक नवरा-नवरी,तुझे बाबा अन राधूसेठ ह्यांचा अन एक खुशालसेठ आणि त्यांची दोन माणसं असा एक ग्रुप, तूमच्या गावी यायला निघाले होतेच. साधारणत: दुपारी तुझे बाबा आणि मंडळी त्या मोठ्या गावच्या बस स्टेशन वर बसची वाट बघत असतांना तिथल्या एका पोलीसाचं लक्ष त्यांच्यावर गेलं. नवरी मुलगी, नवरा अन सोबत दोन माणसं. ती ही थोडी धास्तावलेली, त्याला आढळली. तो लगेच त्यांच्या पर्यन्त गेला. पोलिसानं त्यांना विचारलं तुम्ही कोठून आला आहात अन आता कुठे जाणार आहात, लग्न आताच झाल्यासारखं दिसतंय, कधी झालं, असे प्रश्न विचारले. ह्यांनी त्याला उडवाउडवीची उत्तरं दिली. त्यांनी शेवटी नवऱ्या मुलीला विचारलं तर ती रडायलाच लागली. पोलीसाचा संशय वाढत गेला. मग तो म्हणाला तुम्हा चौघांना माझ्याबरोबर पोलीस ठाण्याला यावं लागेल. चला. पोलिस ठाण्यावर मुलीला त्यांनी तीचं नाव विचारलं. तीनं गीता म्हणून सांगितल्या नंतर आणि साधारणत: तिच्या वयाचा अंदाज आल्यामुळे,पोलिसांनी, नुकत्याच त्यांच्याकडे आलेल्या त्या दुसऱ्या पोलिस स्टेशनच्या तक्रारीस परत वाचून तुझ्या बाबांना,

काकांना नाव-गाव विचारलं. मग त्यांनी ज्या ठाण्यावरून तक्रार आली होती तिथे एका पोलिसाला थोडक्यात अहवालासह मोटर सायकल वर पाठवलं.

तिथे मग वेगानं हालचाली सुरू झाल्या. तिथल्या पोलिसांनी तुझा मामा अन आणखी एक जणाला त्यांच्या जीप मध्ये बसवून त्या गावच्या ठाण्यात आणलं. तिथे आणल्या नंतर मामानं सर्वांना ताबडतोब ओळखलं.मामा तुझ्या वडलांशी खूप भांडला व तुम्ही असं कशाला केलं असं सारखं विचारू लागला. मग काल रात्री तुम्ही कुठे होते वगैरे विचारलं, तेव्हा ह्या दोघांचं आम्ही रात्रीच खुशालसेठच्या घरी लग्न लाऊन दिलं असं तुझ्या बाबांनी अन राधूनं सांगितलं. मग पोलिसांनी त्या सर्वांना मामाच्या तालुक्याच्या ठाण्यावर आणलं. तिथे रीतसर ओळख पटल्यावर मामाकडच्या लोकांच्या विंनंतीवरून त्यांनी तुझ्या गीता मावशीला मामांना परत दिलं. तसंच ह्या लोकांच्या तक्रारीप्रमाणे, पोलिसांनी तुझे बाबा, काका अन राधूसेठ तसेच खुशालसेठ ह्या सर्वांना तुमच्या गावाच्या पोलिस स्टेशन मध्ये नेलं. तिथे त्यांची परत कसून विचारपूस करण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी तुझ्या काकांना सोडून घरी जायला सांगितलं अन दुसऱ्या तिन जणांना पोलिस स्टेशन मधेच थांबवून ठेवलं.

त्यांचं पुढे काय झालं ते सांगण्याआधी इकडे मामाकडच्या हालचाली तुला सांगतो.” असं म्हणून मुरली नाना थांबले. परत त्यांनी

आपली एक बिडी पेटवली व ते मला घेऊन शेताच्या धुऱ्या धुऱ्यानं चालायला लागले.

चालता चालता पुढे म्हणाले—“ मामा आणि त्याच्या बरोबरची मंडळी गीतेला घेऊन घरी आले. त्या आधी तुझ्या नांनीनं तुझ्या आईला फार मारलं होतं. तुझ्या आईनं मग तिला जेवढं माहीत होतं त्यातलं जोड-जाड करून बाकीच्यांसमोर कबुल केलं होतं. पण आल्या आल्याच मामा खूप रागावला तुझ्या आईवर व अंगावर धाऊनही गेला. त्याला इतरांनी आवरलं. त्यानं मग सर्वात आधी तुझ्या आईला आपले सर्व कपडे व तिच्या इतर वस्तु आपल्या पेटीत भरायला लावल्या. मामांच्या घरी विश्वासातला एक वयस्क गडी होता. त्याला सर्व शिवाजीमामा असं म्हणायचे. तुझ्या मामानं शिवाजीमामाला दमणी तय्यार करून ताबडतोब आईला तिच्या सामानासह तुमच्या गावी सोडून यायला सांगितलं. तू फक्त तिला उतरऊन सामान ठेऊन तसाच परत ये असं त्याला सांगितलं.पाणी प्यायला सुधा थांबू नको म्हणून सांगितलं. तुझ्या आईनं रडून रडून आकांत मांडला होता. पण तिकडे कोणीच लक्ष देईना. मग थोड्यावेळात शिवाजी तुझ्या आईला घेऊन रवाना झाला.

मग सर्व जण गीते भोवते जमा झाले. ती अगदी कावरी बावरी झाली होती. भेदरून गेली होती सर्वांनी तिच्यावर प्रश्नांची ची सरबत्ती सुरु केली तेव्हा ती पार गोंधळून गेली व तिला काही धड सांगता येईना. मग तुझी

नानी, मामा, एकजण मोठा व मी असे तिला एका वेगळ्या खोलीत घेऊन गेलो. तिला पाणी , काही खायला अन सरबत वगैरे दिलं. आता शांत हो, घाबरू नको, आता तू घरी आहेस .भ्यायचं काही कारण नाही असं सर्व म्हणाले अन मग आम्ही तिला हळूहळू एकेक प्रश्न विचारू लागलो तशी ती बोलती झाली. तीनं जे सांगितलं ते तिच्याच शब्दात तुला सांगतो. मला अजून सर्व स्पष्ट आठवतं. गीता म्हणाली ‘ ताईनं मला बरोबर परसाकडेला नेलं. आम्ही आपल्या नेहमीच्या ठिकाणी पोहचल्या वर एकमेकींपासून थोडं दूर झालो. तेवढ्यातं दोन माणसं आली अन त्यांनी माझ्या तोंडावर हात ठेऊन मला आधीच उभ्या असलेल्या त्यांच्या दमणी मध्ये बसवलं. दमणीत जिजाजींना पाहून मला थोडा धीर आला. हे लोक कोणी चोर – डाकू नाही आहेत ह्याची खात्री पटली. कारण ते सगळे आपल्या भाषेत बोलू लागले.

मला बसवल्या बरोबर दमणी भरधाव वेगानं धाऊ लागली. आम्ही कुणीकडे चाललो आहे हे मला कळायला काहीच मार्ग नव्हता. ते, अन विशेषत: जीजाजी मला घाबरू नको, तुला काहीही होणार नाही असं सारखं सांगत होते. पाचसहा तासानंतर एक गाव आलं. एका घरासमोर दमणी थांबविण्यात आली व आम्ही सर्वजण उतरून घरात गेलो. आत गेल्यावर सर्वांना खायला-प्यायला देण्यात आलं. ते झाल्यानंतर तिथल्या बायकांनी मला ही नवी साडी नेसवली व घाईघाईन नवरी सारखं सजवलं. नंतर ते मला

त्यांच्या मागच्या वाड्यात घेऊन गेले तिथे त्यांनी लग्नाची सर्व तयारी करून ठेवली होती. एक ब्राम्हण होता. त्यानं मला अन ताईच्या दिराला दोन पाटावर बसवलं. अन लग्नाची पुजा व मंत्र सुरू केले. तो सगळं घाईघाईतच करत होता. अगदी तासदीड तासात त्यान आमचं लग्न लाऊन होमा भवति सात फेरेही मारायला लावले. लग्नाचा सर्व विधी पार पडल्यानंतर सर्वांना चहापाणी करून थोडी विश्रांति घेऊन बांधबुंध करून कुठेतरी जाण्याची तयारी केली.

थोड्याच वेळात , सकाळ झाली अन जिजाजी त्यांचे भाऊ मी अन आणखी एक जण अस चौघांना दुसऱ्या दमणीनं एका गावच्या मोटर स्टँड वर सोडण्यात आल. थोड्या वेळानं तिथली बस पकडून आम्ही काही तासानं त्या जलालपूर की काय नावच्या गावला पोहचलो. तिथे बराचवेळ थांबलो पण पुढची बस काही मिळाली नाही.

काही वेळानंतर एक पोलिस आमच्या जवळ आला. त्यानं विचारपूस केली व नंतर तो आम्हाला तेथील पोलिस ठाण्यात घेऊन गेला. तिथे सर्वांना वेगवेगळ घेऊन पोलिसांनी प्रश्न विचारले. मला विचारलं तेव्हा मी रडत रडत काय काय झालं ते पोलिसांनी सांगितलं. काही तासानंतर दादा अन आपली माणसं तिथे आली. पुढचं तुम्हाला माहीतच आहे.' गीता मावशी थांबली तसं नानीनं अन आणखी काहीनी तिला विचारलं ' त्यांनी तुला काही त्रास दिला का, मारलं का ?' गीता म्हणाली 'नाही. मला त्यांनी काहीही त्रास

दिला नाही. ते म्हणत होते तस तसं मी करत गेले. मला सारखं रडू येत होतं पण त्यांचं ऐकण्यावाचून मला काहीच करता येण्यासारखं नव्हतं.'

हे तीचं सर्व सांगून झाल्यानंतर त्या खोलीत असलेल्या मामा, तुझी नानी , मी, वगैरेंनी गीतेला धीर देऊन सांगितलं की ' आता तू आमच्या जवळ जे बोलली ते कोणालाही सांगू नकोस. लग्न वगैरे लावलं हे तर मुळीच कोणाला सांगू नको. नव्या साडी वगैरे बद्दल विचारलं तर सांग की माझी नेसलेली साडी खूप खराब झाली होती म्हणून त्यांनी नवी नेसवली. कोणीही काहीही विचारलं की तू आम्हाला जे काही सांगायचं ते सर्व सांगितलं आहे असं सांग. व अगदी तोंड बंद ठेव. तुझं लग्न ठरल्या प्रमाणे त्याच मुहूर्तावर दोन दिवसांनी होईल. आम्ही सर्व व्यवस्थित करू.

' तुझ्या मामांनी मग बाकी सर्वांनाही बजावून ठेवलं की गीता सध्या फार घाबरलेली आहे. तिला कोणीही काहीही विचारू नका. लग्न दोन दिवसांवर आलं आहे ,त्या तयारीला लागा. तुझी मोठी मावशी, तिच्याच दीराचं लग्न असल्यानं आपल्या सासरीच होती. अर्थात त्या मावशीच्या नवऱ्याला आणि त्यांच्या घरच्या सर्वांना हे पळवून नेलं वगैरे सगळं माहीत झालं होतंच. मग त्याच दिवशी दुपारी मामा अन दोन-तिन मोठी मंडळी तुझ्या मोठ्या मावशीच्या घरी गेले. त्यांनी मावशीकडच्या लोकांना सर्व सांगितलं व त्यांची खूप मनधरणी करून समजूत काढली. मोठ्या मावशयाचा तसाही नेहमी मामाकडच्या कारभारत सल्ला असायचाच.

म्हणून त्यांनी ही समजून घेऊन त्यांच्या कडच्या सर्वांना मनवलं व लग्न ठरल्यादिवशीच होईल असं सांगितलं. व सर्व लग्नविधी सुरू ठेवा व तयारीला लागा असं सांगितलं.

मग मामा व मंडळी परत येवून लग्नाच्या कामाला लागली. आता अगदी जास्त बडेजाव न करता लग्न साध्या पद्धतीनं करायचं असं सर्वानुमते ठरलं. त्याप्रमाणे मग ठरल्या मुहूर्तावर गीतेचं लग्न होऊन तिची बीदाई करण्यात आली.

पुढे तुमच्या कडे काय काय झालं ते आम्हाला नंतर इकडून तिकडून कळत गेलं, तसं तुला सांगतो.” नाना अन मी परत विहिरीवर जाऊन पाणी प्यायलो. संध्याकाळ व्हायला अजून थोडा अवधि होता, म्हणून परत नानांनी सांगायला सुरवात केली.

ते म्हणाले “ तुझ्या आईला सामानासहित सोडायला शिवाजी गेला तेव्हाच नानी, मामा ह्यांनी तुझ्या आईला रागावून म्हटलं होत की आम्ही तुझ्यासाठी अन तू आमच्यासाठी आता मेली आहेस. परत ह्या घराला तुझ तोंड दाखवू नको. तिकडे तुमच्या गावच्या पोलिसांनी तुझे बाबा, आतोबा अन राधूसेठ ह्या तिघांनाही तुमच्या गावच्या स्टेशन मध्ये एक दिवस ठेवलं.

आमच्याकडच्या लोकांनीही जास्त चर्चा होऊ नये अन आमची बदनामी होऊ नये म्हणून पुढे काही त्या केसला रेटलं नाही. अन तुम्हाला काय करायचं असेल ते करा असं आमच्या तालुक्याच्या पोलिस स्टेशनला कळवलं. मग तिकडच्या अन तुमच्या गावच्या पोलिसांनी खूप पैसे वगैरे घेऊन तिसऱ्या दिवशी त्या तिघांनाही सोडून दिलं. पण आम्ही असं ऐकलं की त्यात तुमच्या कडच्यांचा बराच पैसा खर्च झाला. आता हा सगळा पैसा तुझ्या बाबांनाच खर्च करावा लागला. एवढे पैसे घरात नसल्यामुळे त्यांना आर्धी अधिक शेती गहाण ठेवावी लागली. त्यामुळे तुमच्या घरची परिस्थिति बिघडुन गेली. उरलेल्या जेमतेम शेतीवर सर्व कुटुंबाचा खर्च चालवायचा, कर्ज फेडायचं ही फार मोठी सर्कस तुझ्या वडिलांना आता करावी लागणार होती. बरं भाऊबंद ही कोणी साथ देईना. तुझ्या आतोबांचाच हा सर्व खेळ असल्यानं तुझे आई-बाबा त्यांच्यावरही खूप नाराज झाले होते. त्यांना स्वत:लाही त्यांचं मन आपराध्यसारखं खातच होतं. म्हणून त्यांनीही तुमच्याकडे येणजाण कमी केलं. अशी सर्व बाजूंनी कोंडी झाली.

# ७

तुझ्या काकाचं दुसरं लग्न करून देण अशात सोपं नव्हतं. पण त्याची गरजच पडली नाही. कारण ह्या प्रकारानंतर 2-3 महिन्यांनी घरात कोणी लीलाधरच्या लग्नाचा विषय काढला तेव्हा तुझ्या काकांनी स्पष्ट नकार दिला म्हणे. ‘मी आता आयुष्यभर दुसरं लग्न करणार नाही. तुम्ही ह्या फंद्यात पडू नका’ असं त्यांनी सर्वांना बाजाऊन सांगितलं. तुझ्या आईनं त्यांची खूप मनधरणी केली, समजूत काढली पण ते ऐकायलाच तयार नव्हते असं म्हणतात. तुमच्या घरची परिस्थिति फार नाजुक झाली होती. बरं तुझे काकाही काही फार हिम्मतीचे नव्हते. वडील भावानं जे सांगितलं ते, ते निमूटपणे करीत.त्यांना स्वत: होऊन काही करता यायचं नाही. त्यामुळे सर्व कामाचा बोझा तुझ्या वडलांवरच पडला.

तुझी आई, आमची काशी, मात्र खूप हिमतीची. ती घरातलं तर सगळं करायचीच. पण तुमचं एक छोटसं किरण्याचं दुकान होतं ते चालवायलाही तुझ्या बाबांना मदत करायची. एवढच नव्हे तर वेळप्रसंगी शेतीची कामही करायची. तिचा स्वभाव मुळातच खूप चांगला होता व मनमिळाऊ होता. त्यामुळे गावातल्या बऱ्याच बाया ,शेजारच्या बाया तिच्या चांगल्या मैत्रिणी झाल्या. वेळप्रसंगी त्या तुझ्या आईला मदत करू

लागल्या. वेळप्रसंगी तुझे वडील रात्री जागलीला, झोपायला शेतावर जायचे तेव्हा ह्या आईच्या मैत्रिणी आईकडे रात्री सोबतीला, झोपायलाही यायच्या. तीही इतरांना खूप मदत करायची. अडिअडचणीत, बाळंतपणात इतरांच्या मदतीला जायची. त्यावेळी तुझ्या मोठ्या दोन बहिणी अन सर्वात मोठा भाऊ अशी तिन मुलं घरात होती. पुढे तुम्ही तिन भाऊ व एक बहीण अशी आणखी कुटुंबात भर पडली. त्यावेळी जसजसे तुझे मोठे भाऊ अन मोठी बहीण वाढू लागले तसतसे ते आई-बाबांना दुकानात, घरकामात मदत करायला लागले. तुझा मोठा भाऊ शाळेतही जाऊ लागला. त्यावेळी मुलींना शाळेत पाठवतच नसत म्हणून बहिणी काही शाळेत गेल्याच नाही. तुझ्या बाबांनी खूप मेहनत करून हळूहळू गहाण पडलेली शेती सोडवली. मग विस्कटलेली घडी थोडी सुधारत गेली.

सर्वात जास्त कमाल तर तुझ्या आईची. ह्या सगळ्या घडल्या प्रकारात जवळ जवळ 18 वर्ष तीचं माहेर सुटलं. ती माहेरी गेलीच नाही की माहेरूनही तिला कधी कोणी भेटायला आलं नाही. नाही म्हणायला जेव्हा तुझ्या मोठ्या बहिणीचं सर्वात आधी लग्न झालं तेव्हा अन आता चार वर्षापूर्वी तुझ्या मोठ्या भावाचं अन दुसऱ्या बहिणीचं लग्न झालं तेव्हा मामाकडचा आहेर म्हणून, आमचा मुनीम शिवाजीमामा हा तुझ्या आई-वडलांसाठी व मुलांसाठी कपडे घेऊन तुमच्या गावी लग्नात गेला होता. तो तिथे एक-दोन दिवस राहिलाही.

तुझ्या आईवर शिवाजीचा खूप जीव होता. तेवढ्या त्या दोन दिवसाच्या मुक्कामात शिवाजीला तुझ्या आईनं ह्या सर्व घटना अन गोष्टी सांगितल्या. शिवाजीनं परत येऊन जेव्हा हे सर्व आम्हा लोकांना सांगितलं तेव्हा कुठे आम्हाला काशीबद्दल हे सर्व कळलं. मग सर्वांना तिच्या बद्दल खूप हळहळ वाटली. तुझी नानी तर खूप रडली. 18 वर्ष हा फार मोठा काळ होता. एवढ्या काळात हळूहळू जखमा भरत गेल्या. झाल्या गोष्टीचा विसर पडू लागला. झालेल्या गोष्टींची तिव्रता कमी होऊ लागली.

इकडे गीतेचंही चांगलं चाललं होतं . तिलाही आता चारपाच मुलंमुली झाल्या होत्या. तीचं माहेरी येण वगैरे व्यवस्थित सुरू होतं. सगळं हळूहळू निवळू लागलं म्हणूनच आता सहा महिन्यांपूर्वी जेव्हा तुझ्या मामाच्या मोठ्या मुलीचं लग्न ठरलं तेव्हा तुझ्या मामानं तुझ्या वडिलांना पत्र लिहून ते शिवाजीला देऊन लग्नाच्या दहा दिवसा आधी तुझ्या आईला लग्नासाठी येण्याची विनंती केली. शिवाजीमामा ते पत्र घेऊन तुमच्या घरी गेला,एक दिवस राहिला. त्यानं ही सर्वांची समजूत काढली अन मग शेवटी तो तुझ्या आईला अन तुम्हा धाकट्या तिन मुलांना घेऊन आला.

ईथे आल्यावर सर्वांना खूप भरभरून आलं अन सर्वांना खूप आनंदही झाला.लग्न आनंदात पार पडलं अन चार पाच दिवसानं शिवाजी तुम्हा सर्वांना परत तुमच्या गावी सोडून आला. तुझे वडील मात्र लग्नाला आले

नाही याची सर्वांना रुखरुख वाटत होती. पण आता सर्व निवळत जाईल अन जाणयेण सुरू होईल असं सर्वांना वाटायला लागलं.

म्हणूच आता दोन महिन्यांपूर्वी तुझ्या मोठ्या भावाच्या हातचं लिहलेलं, तुझ्या आईचं पत्र जेव्हा मामाला आलं तेव्हा सर्वांना आनंद झाला. तुझ्या आईनं त्या पत्रात तुला पाचव्या वर्गात शिकायला येथे पाठऊ का असं विचारलं होत. मामानं अन तुझ्या नानीनं ताबडतोब मामाच्या मुलाच्या हातानं पत्र लिहून होकार कळवला. म्हणूच तू आज इथे आहेस."

एवढं बोलून मुरलिंनाना थांबले, संध्याकाळ होतच आली होती, म्हणून आम्ही पाणी पिऊन परत घराकडे निघालो. परत जातांना वाटेत माझ्या ज्या काही लहान मोठ्या शंका होत्या त्या मी नानांना विचारतच होतो. आम्ही चालत चालत घरी आलो. आल्यावर मामी म्हणल्याही की आज खूप वेळ रमलात शेततात. मला जवळ जवळ सगळीच हकीकत नांनांकडून कळली होती. त्यांना इतक्या वर्षात इकडून तिकडून जे माहीत झालं होतं त्यावरून, काही आईंनी शिवाजीमामाला जे सांगितलं होतं त्याच्या कडून, काही आईंनी स्वत: नंतर सांगितलं होतं त्यावरून जोडून-जाडून मला सर्व सांगितलं होतं०

मला आठवतं, मी तिथे शिकायला गेल्यानंतर दोन-तिन महिन्यांनीच माझ्या मोठ्या मामी म्हणजे ह्या मामांच्या वहिनी, वारल्या. त्या तशा नेहमी

आजारीच असायच्या .कोणाशी जास्त बोलत ही नसत. त्या वारल्यानंतर 4-5 दिवसांनीच , दुखवट्यात म्हणून माझे आई व बाबा दोघही मामाकडे आले. जवळ जवळ वीस वर्षांनी बाबा आपल्या सासरी आले होते. पण ते आले म्हणून सर्वांना फार बर वाटलं. सर्वांनी त्यांचं तशातही यथोचित स्वागत केलं. बाबांनाही खूप चांगलं वाटलं. इतके वर्ष दुरावलेलं इतक जवळच नातं परत जुळलं होतं, ह्याचा सर्वांनाच आनंद झाला होता. एक दिवस तिथे राहून,आईला तिथेच सोडून बाबा परत गेले. नंतर मी तिन वर्ष तिथे असेपर्यंत आईचं माहेरी येण सुरळीत सुरू झालं. आमच्या दुसऱ्या मामीच्या एका बाळंतपणासाठी आली, तेव्हा तर आई जवळ जवळ एक महिना तिथे राहिली..बाबा काही फारसे आले नाहीत नंतर. आमच्या कडेही काही कार्य प्रसंग नसल्यानं, मामाही कधी आमच्या गावी आले नाहीतं. तसा त्यांचा पसारा अन कामाचा व्याप ही खूप असल्यामुळे ते फारसे नातेवाईकांकडे जायचेच नाहीत. तिथे मी सातवी पर्यंतच शिकलो. मला तिथे अभ्यासाला खूप कमी वेळ मिळायचा. म्हणून मी वडलांच्या मागे लागून आठवीपासून आमच्या जिल्ह्याच्या गावी शिकायला गेलो.

सातवी पर्यन्त मामाकडे असतांना दर दिवाळीच्या व उन्हाळयाच्या सुटीत मी आमच्या घरी यायचो. तोपर्यंत मलाही चांगलंच कळायला लागलं होत. मला काकांबद्दल खूप आदर वाटायला लागला. ह्या झाल्या प्रकारात सर्वात जास्त कमाल काकांचीच होती. त्यांनी लग्न तर केलं नाहीच पण ते

आई बाबांशी खूप आदर ठेऊन वागायचे. आम्हा सर्व बहीण-भावांवर खूप प्रेम करायचे. आमची खूप काळजी घ्यायचे. तसे ते शिस्तीचेही खूप पक्के होते. आमच्यावर त्यांचं नेहमी लक्ष असायचं. काही चुकलं की कान धरून एखादी झापडही मारत.

त्यांची दिनचर्या अगदी ठरलेली असायची सकाळी त्यांचं सर्व आटोपलं की चहा वगैरे घेऊन आमचं किरण्याचं दुकान होतं ते उघडायचे. सकाळी सकाळी ग्राहकांची बरीच गर्दी असायची. ते सुरवातीला एकटेच सर्व सांभाळायचे नंतर थोड्या दिवसांनी माझा मोठा भाऊ दुकानात ज्यायचा. मग ते दोघंही तिथे असायचे. दहासाडेदहाला घरी आंघोळीला आले की मग तासदीड तास त्यांची पुजा,पोथी वाचन सुरू असायचं. मग परत जेवायच्या आधी तास-अर्धातास दुकानावर जात. जेवल्यानंतर दुपारी दुकान बंदच असायचं. मग ते तिथेच किंवा घरी येऊन चार वाजेपर्यंत विश्रांति घेत. चारला चहा वगैरे घेऊन परत दुकान उघडायचे. रात्रीही ते दुकानातच झोपायचे. घरच्या बाकी कारभारात ते पडायचे नाही. बाबांनी काही विचारलं तर सांगायचे. त्यांनी सांगितलेलं काम करायचे. अतिशय साधं असं त्यांचं राहणं होत. जेवणही साधं अन बेताचंच असायचं त्यांचं. कुटुंबातले ते एक अविभाज्य घटकच नव्हते तर त्यांच्या विषयी सर्वांना खूप आदर होता. माझे वडील वयाच्या 64 व्या वर्षीच वारले. तेव्हा काका 56-57 वर्षाचेच होते. वडील वारल्यानंतर दहा वर्षानं आईही वारली. आणि

त्यानंतर बाराएक वर्षांनी काका वारले. आई वारल्यानंतर मात्र त्यांना आमच्या खेड्यात थोडं एकाकी वाटायला लागलं. अर्थात माझे मोठे भाऊ, वहिनी, त्यांच्या मुली-मुलं सर्व तिथे होतेच. मग ते माझ्या दुसऱ्या मोठ्या भावाकडे 2-3 महीने ,कधी माझ्याकड 2-3 महीने येऊन राहायचे. त्यांची पोथी-पुजा, सुरू असायची. आमच्या मुलांमध्येही रमायचे. त्यांना खेळवायचे. आमच्या येणाऱ्या जाणाऱ्या मित्रांबरोबर नेहमी बोलायचे.

माझी मित्र मंडळीही त्यांच्याशी नेहमी गप्पा मारायची. त्यांचं कधी काही दुखलं , खुपलं तर माझे एक नेहमी येणारे मित्र त्यांना विचारायचे, “काकाजी आज कसं वाटतंय ?” मग काकाजी म्हणत “ कालच्यापेक्षा अर्धा-एक आणा फरक आहे आज.” मग माझे ते मित्र त्यांना नेहमी हसत,हसत म्हणत “ काकाजी तुम्हाला अगदी असं एक आणा, अर्धा आणा वगैरे कसं समजतं ? “ काकाजी मग हसत हसत म्हणत, अरे ती एक बोलायची पद्धत आहे बाबा.

माझा मुलगा वर्षभराचा असतांना ते एकदा माझ्याकडे तिनेक महिने राहायला आले. माझा मुलगा लहानपणी अगदी गुटगुटीत व वजनदार होता. काकाजींना त्याला उचलून कडेवर घेता यायचं नाही. त्यांना ज्यावेळी मुलाला घेऊन फिरऊन आणवसं वाटलं की ते नेहमी माझ्या बायकोला म्हणायचे ‘ सुनबाई ह्याला थोडं उचलून माझ्या कडेवर दे. मी ह्याला थोडं बाहेर फिरऊन आणतो.” मग ती मुलाला त्यांच्या कडेवर बसवून द्यायची.

परत आल्यानंतर परत कडेवरून उतरवूनही घ्यायला सांगायचे. रोज रात्री स्वयंपाकापूर्वी संध्याकाळी, 'भूक नाही, किंवा एकच पोळी खाईन बरं', असं कटाक्षानं माझ्या बायकोला सांगायचे. आपल्यामुळे कोणालाही थोडसुद्धा त्रास व्हायला नको असा त्यांचा कटाक्ष असायचा. अगदी साधं, सरळ काम होतं त्यांचं. आमची काळजीही खूप करायचे.

मी दोन वर्ष मुंबईत राहून परत आल्या नंतर एकदा ते असेच राहायला आमच्याकडे आले. मी कुठेही, स्कूटरनं बाहेर निघालो की नेहमी म्हणत 'जपून जा. जोरानं स्कूटर पळवू नको.' एवढा मी मुंबईच्या लोकल मध्ये फिरलेला असूनही मी जेव्हा जेव्हा सिटि-बस ने बाहेर जायला लागलो की त्यांच्या सूचना सुरू व्हायच्या. बरोबर चढ, उभ्याने जाऊ नको. पाकीट जपून ठेव ई. मला हसायला यायंचं तेव्हा. पण इतकी ते नेहमी काळजी करत. आम्ही आमच्या खेड्यावर घरी गेलो की माझ्या बायकोला नेहमी सांगायचे, ' ईथे चूल आहे, गॅस नाही. लाकडांचा धूर होतो. लक्ष ठेवा. पदर सांभाळा.' नदीवर धुण घेऊन जातांना, खडकावरून पाय घासरेल. खडक शेवाळलेले असतात. सावकाश पाय ठेवा, ' अशा सूचना नेहमी द्यायचे।

बऱ्याच वर्षांनंतर हयावर्षी काही महिन्यांपूर्वी 2-3 दिवसांसाठी आमच्या खेड्याच्या घरी गेलो होतो. मोठ्या भावाची मुलं अजूनही तिथे राहतात. घरी गेलो अन जुन्या सर्व आठवणी जाग्या झाल्या. शेताकडे चक्कर मारायला गेलो. जातांना मध्ये आडव्या येणाऱ्या नदीच्या खडकांवर

झाडाखाली थांबलो. जवळ जवळ 35 वर्षांपूर्वी ह्याच नदीवर काकांची दशक्रिया, काका वारल्यानंतर दहाव्या-अकराव्या दिवशी केलेली पुजा, पिंडदान वगैरे सर्व आठवलं अन डोळे भरून आले. त्यादिवशी बराचवेळ एकटाच त्या खडकांवर बसून राहिलो. हे आता जे लिहलं ते सर्व तसतसं डोळ्यासमोरून सरकत गेलं. एका कोणाच्या तरी अविचारी सलल्यानं त्यांच्या जीवनात जे घडलं त्याची शिक्षा त्यांनी , त्यांची काहीही चूक नसतांना भोगली. तसं म्हटलंतर केवळ त्यांनीच नाही तर ह्या कहाणीच्या सर्वच मुख्य पत्रांनी ते , त्यांची काही चूक नसतांना भोगलं. नदीच्या त्या खडकानवरून मला उठावंसच वाटेना. मनात विचार आले की हे सर्व जगतांना, भोगतांना कहाणीच्या ह्या पात्रांना काय वाटलं असेल? तसं आईच्या मनातलं मला थोडं बहुत, मी मोठा झाल्यानंतर तिच्या तोंडून ऐकायला मिळालं होतं. एखादवेळा मी विषय काढला की ती सांगायची.पण खोलात ती कधी जायची नाही.कदाचित ह्या खपली आलेल्या जखमांना तिला परत बोट लावायचं नसेल.

त्यादिवशी तिथे नदीकाठी बसल्या बसल्या इतका ह्या गोष्टींमध्ये गुरफटून गेलो की ही सर्व पात्र ( काशी, लीलाधर, गीता ) माझ्याशी बोलायला लागली. त्यांच्या व्यथा सांगायला लागली.

# काशी

ह्या घरात माझं लग्न झालं तेव्हापासून मी खूप आनंदात होते. ह्यांचा स्वभाव खूप चांगला होता. माझ्याशी नेहमी खूप प्रेमानं बोलायचे,वागायचे. मी लग्न होऊन आले तेव्हा कुटुंब मोठं होतं. सख्खी नणंद एकच होती. त्यांचं लग्न माझ्या लग्नाधीच झालं होतं, त्यामुळे त्या सासरीच असायच्या. आणि सख्खे दीर ही एकच होते. पण घरात इतर चुलत मंडळी बरीच होती सर्व कामं एकत्रच करावी लागत. घर आंगण झाडण, सारवण, विहीरीवरून पाणी भरून आणण, नदीवर जाऊन कपडे धुण, दोन्ही वेळचा स्वयंपाक, वेळप्रसंगी शेतात जाण अशी सर्व कामं आम्ही एकत्र करायचो. मग थोडे हेवेदावे, रूसवे फुगवे आलेच. सर्वांशी मिळून-मिसळून रहावं लागायचं. माझी पहिली दोन मुलं चाला-बोलायला लागली तोपर्यंत आम्ही असे एकत्र कुटुंबात राहयचो. मग काही कारणानं एकाची तिन कुटुंम्ब झाली. मग मी, हे, माझे दिर लीलाधर अन माझी मुलं असे आम्ही एक कुटुंम्ब म्हणून राहायला लागलो. ह्यांच्या आणि माझ्या ह्या दिरांच्या मध्ये आठ-नऊ वर्षांचं अंतर होतं. त्यांचं लग्नाचं वय झालं, तसं आमच्याकडे त्या हालचाली सुरू झाल्या. नात्यागोत्यातली एखादी मुलगी मिळाली तर छान

होईल असं आम्हा सर्वांनाच वाटत होतं. माझ्या चुलत बहीणीबद्दल म्हणजे गीतेबद्दल आमच्या घरी तशी चर्चा सुरू होतीच. एकदा दोनदा मी माहेरी गेली असतांना तिथेही मी, ही गोष्ट काढली होती. माहेरचेही त्यावर विचार करू लागले होते. अन मग ते गीतेला पळवून आणून लग्न लाऊन द्यायचं रामायण घडलं.

ज्या रात्री आमच्या घरी माझ्या नणदेच्या नवऱ्यानी ही योजना आखली अन समोरच्या ओसरीत ह्यावर चर्चा सुरू झाली तेव्हा मी स्वयंपाक घरात होते. पण त्यांचं सर्व बोलणं माझ्या कानी पडत होतं. खरं म्हणजे तेव्हाच ह्या भयानक कल्पनेची, योजनेची मला खूप भीती वाटायला लागली होती. पण पुरुषांमध्ये जाऊन मी काय बोलणार. आणि माझ्या बोलण्याला कोणीही दाद दिली नसती हे ही मला माहित होतं . शेवटी मला विश्वासात घेऊन अन पुढचं सर्व समजाऊन सांगण्यासाठी खुशालसेठनी बाहेर ओसरीत बोलावलं तेव्हा मी त्या सर्वांना, हे बरोबर होणार नाही ह्याची घाबरत घाबरत कल्पना दिली. पण माझं काहीही न ऐकता त्यांनी हे माझ्या गळी उतरवलं. आमच्या काळात ह्या असल्या घरच्या कारभारात बायकांच मत कोणी कधी विचारायचं नाही. ‘तुला तुझी बहिणच जाऊ म्हणून येईल. पुढे सर्व चांगलं होईल असं ते सारखे म्हणत होते. खरं सांगायचं तर मलाही मनापासून गीता माझी जाऊ म्हणून यावी असं वाटतच होतं. पण अशा तर्हेनं नाही. पण आता हे लोक सांगतील तसं करण मला भागच होतं。 माझ्या

मनाविरुद्ध का होईना, मी ह्या त्यांच्या योजनेत सामील झाले. अन पुढे हे सर्व घडलं.

ह्या सर्वचीची फार मोठी किंमत मला पुढे आयुष्यभर मोजावी लागली. गीतेला शोधून जेव्हा परत तिला घरी आणलं तेव्हा मला आईनं जे मारलं, इतरांनी धारेवर धरून मला टाकून बोलणी केली ते घाव कधीही भरून येण्यासारखे नव्हते. ज्या प्रकारे मला ताबडतोब सासरी पाठवून देण्यात आलं, ते पुढे अनेक वर्ष मी विसरू शकले नाही. ह्या सगळ्या प्रकारात तब्बल अठरा-विस वर्ष मला माझं माहेर सुटलं हे माझं सर्वात मोठं दुख: होतं. बाकीही अनेक गोष्टींना मला तोंड द्यावं लागलं, ह्या सर्व प्रकरणात आमच्या घरचा बराच पैसा खर्च झाला. त्यासाठी ह्यांना काही शेतीही गहाण ठेवावी लागली.

पण हे खूप मेहनती होते. सुस्वभावी होते. त्यामुळे आम्हाला गावच्या लोकांची खूप साथ मिळाली. माझा मोठा मुलगा जसजसा मोठा होत गेला तसतसा तो ह्यांना कामात, दुकानातही, मदत करू लागला. ह्यांच्या बरोबर शेतीचं कामही करू लागला. काही वर्षातच ह्यांनी आमची गहाण ठेवलेली शेती सोडवून घेतली. इकडे माझी मोठी मुलगीहि मला घर कामात इतर कामात मदत करू लागली. आपल्या धाकट्या भावा-बहिणींना सांभाळू लागली. त्यामुळे मीही घरच्या घरी कापूस, अन्नधान्य घेऊ-विकू लागली . त्यामुळे घर खर्चाला बराच आधार मिळू लागला.

परिस्थिति सुधारल्या नंतर आम्ही मोठ्या मुलीचं लग्नही केलं अन त्या नंतर 2-3 वर्षांनी मोठा मुलगा अन दुसऱ्या मुलीचं लग्न ही केलं. ह्या तिन्हिही लग्नात आम्ही माझ्या माहेरच्या लोकांना आमंत्रीत केलं, आग्रहानं बोलावंलं. पण कोणी आलं नाही. एवढं मात्र खरं की ह्या तिन्हिही लग्नात मामा कडचा आहेर,कपडे घेवून माझ्या माहेरून शिवाजी मामा आला. दोनदोन दिवस राहिलाही. तो सर्वांची हळहळ, खबर बात सांगायचा त्यावरून आशा वाटू लागली की हळूहळू हे सर्व निवळेल व आमचं जाण-येण लवकर सुरू होईल. मी आतुरतेनं त्या दिवसाची वाट बघू लागले.

बऱ्याच वेळा मला खूप रडायला यायचं. मग मी एकटी खूप रडून घ्यायचे. दुर्दैवानं हे सगळे भोग वाट्याला आले. आमच्या चुकीची शिक्षा म्हणून ते आम्ही बिन तक्रार भोगले. माहेर सुटल्याच्या ह्या जीवघेण्या दुख्खा बरोबर मला आणखी सर्वार जास्त सलत होती ती गोष्ट म्हणजे आमच्या लिलाधरनं- माझ्या दीरानं लग्न न करण्याचा घेतलेला निर्णय. आम्ही सर्वांनी अन विशेषत: मी त्यांची खूप मनधरणी केली, समजूत काढण्याचा प्रयत्न केला.पण त्यांनी कोणाचं ही ऐकलं नाही. बाकी त्यांचा कुठलाच त्रास नव्हता. आमच्याशी खूप प्रेमानं, आदरानं वागायचे. ह्यांना कामात, दुकानात मदत करायचे. मुलांनाही त्यांचा खूप लळा होता. मला मात्र सारखं हे सलायचं की त्यांचा काही एक दोष नसतांना त्यांना हे भोगावं लागतंय.

घरात धाकटी जाऊ येण्याची मी किती स्वप्न पाहिली होती. सर्व विसकटून गेल्याचं फार दुख: व्हायचं.

आयुष्य पुढं चाललंच होतं. सर्वात मोठा मुलगा चवथी पर्यंतच शिकला. त्यावेळी मुलींना शाळेत पाठवत नसत.म्हणून मोठ्या दोन्हीही मुली काही शिकल्या नाही.पण नंतरची मुलं शिक्षणात चांगली होती.शाळेत तर नेहमी पहिल्या दुसऱ्या नंबर वर असायची.त्यांना कसंही करून पुढे शिकवायचं असं आम्हाला खूप वाटायचं. पण गावात चवथी पर्यंतचीच शाळा होती.मग त्यातल्यात्यात जो मोठा होता त्याला पाचवीत माझ्या नणदेच्या मुलाच्या घरी शिकायला पाठवलं. ते तालुक्याच्या ठिकाणी राहत. त्याच दरम्यान एक खूप चांगली घटना घडली. ती म्हणजे माझ्या भावाच्या मोठ्या मुलीचं लग्न ठरलं. ह्या लग्नाला तुम्ही सर्वजण या असं माझ्या भावाचं आग्रहाचं पत्र आम्हाला आलं. एवढं नव्हे तर लग्नाच्या 8-10 दिवसा आधी शिवाजीमामा आम्हाला घ्यायला आला. मग हे म्हणाले की " मी पुढे कधीतरी जाईन. पण तू लहान्या तिन्ही मुलांना घेऊन जा शिवाजीमामा बरोबर. मग मी तयारी करून दुसऱ्याच दिवशी शिवाजीमामा बरोबर तब्बल 18 वर्षांनी माहेरी आले. पोहचल्यावर मलाच नाही तर माहेरच्या सर्वांना खूप आनंद झाला. मोठ्या मायेनं, प्रेमानं सर्वांनी आमचं स्वागतं केलं. आम्ही लग्नानंतर 2-3 दिवसांनी परत निघालो तेव्हा तर सर्वांना खूप भरून आलं. त्यानंतर पाच-सहा महिन्यांनीच माझा तिसरा

मुलगा चवथी पास झाला अन आम्ही माझ्या भावाला विचारून त्याला पाचवी पासून शिकायला माझ्या माहेरी पाठवलं. तेव्हापासून मग माझं माहेरी येणजाण नियमित सुरू झालं. हा मुलगा शिकायला तेथे गेला त्यानंतर 2-3 महिन्यांनीच माझ्या मोठ्या वाहिनी वारल्या. तेव्हा हे ही माझ्याबरोबर माझ्या माहेरी आले. त्या दु:खाच्या प्रसंगिसुद्धा हे आल्याचा सर्वांना आनंद झाला. पुढे काही महिन्यांनी मला वहिंनीच्या बाळंतपणासाठी माहेरून घ्यायला आले. मग मी परत जवळ-जवळ एक महिन्यासाठी माहेरी होते. त्यावेळी मनमोकळेपणी माहेरी राहता आलं. मागचा विषय एकदाही चुकून कोणीही काढला नाही. पुढे तिन वर्ष माझा मुलगा तिथे शिकायला होता. त्यादरम्यान तर बरेच वेळा माहेरी येणजाण झालं. असा एकदाचा माझा हा 18 वर्षांचा वनवास संपला.

# गीता

माझ्या जीवनात जे काही घडलं ते अगदी अकल्पित होतं. मला कधी स्वप्नातही वाटलं नव्हतं की असं काही माझ्या जीवनात घडेल. माझ्या लग्नासाठी बोलणी सुरू होती तेव्हपासून लग्न ठरेपर्यंत जे जे घडलं ते सर्व मला माहीत होतं. कारण दोन्ही ठिकाणच्या मुलाकडचे मला पाहायला आले होते. लग्न मोठ्यांनिच ठरवलं. सगळी पाहुणी मंडळी यायला सुरू झाली होती. सर्व बहिणीही आल्या होत्या.मी आनंदात होते. लग्नाच्या तीन-चार दिवस आधीचीच ती घटना. मला त्यादिवशी काशीजीजीनं ‘ माझ्या बरोबर परसाकडला येते का “ असं विचारलं अन मी हो म्हणून तिच्या बरोबर गेले. गावाच्या बाहेर आमच्या नेहमीच्या ठिकाणी गेल्यावर आम्ही बसायला म्हणून एकमेकींपासून थोडं दूर झालो अन त्या दमणितून दोन जणानी मला उचलून त्या दमणीत बसवलं. माझ्या तोंडावर त्यांनी हात ठेवला असल्यामुळे मी ओरडूही शकले नाही. मी पार घाबरून गेले होते. मला बसवल्याबरोबर त्यांनी दमणी खूप जोरात हाणली. थोडावेळ मी घट्ट डोळे बंद करूनच होते. हळूहळू डोळे उघडले तसे त्या माणसांमध्ये मला जीजाजी दिसले. अन माझ्या जीवात जीव आला. ते लोक आपसात फार

काही बोलतच नव्हते पण जीजाजी मला दोन-तिन वेळा म्हणाले. ”घाबरू नको. तुला काहीही होणार नाही. सर्व व्यवस्थित होईल.” तशातही मला थोडा धीर आला. त्यांनी मला कसलाही त्रास दिला नाही. हे लोक कोणी चोर-डाकू नाहीत हे कळल्यावर माझी भीतीही थोडी कमी झाली. मी गप्प बसून होते. आणखी काय करणार?

मला वाटतं साधारण मध्य रात्रीच्या सुमारास आम्ही एका गावाला कुणाच्या तरी घरी पोहचलो.ते कोणाचं घर होतं मला माहीत नव्हतं. पण तिथे आधीच लग्नाची सर्व तयारी करून ठेवलेली होती.तिथल्या घरच्या बायकांनी मला आधी खायला वगैरे दिलं. नंतर माझे हातपाय धुवून त्यांनी मला नवी साडी नेसवली. तिकडे काशीजीजीच्या दिरालाही नवे कपडे नेसवून त्यांना लग्नाच्या पाटावर बसवलं. मलाही ते लग्न लावण्यासाठी घेवून जाऊ लागले तेव्हा मी रडत रडत खूप विरोध केला. पण त्या सर्वांनी माझं काही एक ऐकलं नाही. तिथे त्या लोकांनी लग्नाची तयारी आधीच करून ठेवली होती. अगदी लग्न लावणारा ब्राम्हणही आलेला होता. मग त्यानं आम्हाला बसवून ,पुजा वगैरे सर्व करून विधिवत आमचं लग्न लावलं. नंतर परत आमचे कपडे वगैरे बदलून सर्वांची जेवण झाली. ते झाल्याबरोबर आमची परत निघायची तयारी सुरू झाली. झटपट सर्व करून, जिजाजी, त्यांचे भाऊ- नवरदेव , मी आणि आणखी एक जण अशा चार जणांना घेवून दमणी निघाली. थोड्या वेळानं त्या दमणीनं आम्ही एका गावी

येवून उतरलो. त्या गावावरून नंतर आम्ही सर्व बस ने एका दुसऱ्या मोठ्या गावी आलो. बहुधा ते तालुक्याचं ठिकाण असावं .तिथून बस बदलून आम्हाला त्यांच्या गावी जायचं होतं. पण बराच वेळ बस मिळाली नाही. मग तिथला एक पोलिस आला. अन त्यानं सर्व विचारपूस करून आम्हाला ठाण्यावर नेलं. मला जे जे विचारलं त्याची खरी खरी उत्तर मी दिली. अन मग परत मला आमच्या भावाच्या स्वाधीन करेपर्यंत ते सगळं घडलं. मी आमच्या घरी आल्यानंतर, मला भाऊ, मोठ्या काकू, मुरली काका ह्यांनी एका वेगळ्या खोलीत नेवून सर्व विचारलं. मी जे जे झालं ते ते त्यांना सांगितलं. अगदी माझं लग्न झालय हे सुधा सांगितलं. त्या सर्वांनी आता हे कोणालाही काही सांगू नको असं बजावून सांगितलं. 2-3 दिवसात ठरल्याप्रमाणे तुझं लग्न होईल असं त्या सर्वांनी मला सांगितलं०

माझ्या मनातली घालमेल मलाच ठाऊक. मला वाटत होतं की आपलं लग्न तर झालेलं आहे. आता ते परत होणार. माझं मन मला सारखं खात होतं. प्रामाणिकपणे माझ्या त्यावेळी काय मनात आलं ते खरं सांगायचं तर माझं आता परत लग्न होऊ नये असं मला वाटत होतं. मनावर असलेल्या संस्कारांमुळे परत लग्नासाठी मन तयारच नव्हतं. आणि जे झालं त्यात फार काही वाईट झालेलं नव्हतं. मला पहिल्या पासून काशीजीजीचा खूप लळा होता. आमची आपसात खूप गट्टी होती. म्हणून आपण काशीजीजीची जाऊ झालो तर किती चांगलं होईल असं मला सारखं वाटायचं. जीजीच्या ह्या

दिरांना मी आधी एक-दोनदा पाहिलंही होतं अन त्यांच्या चांगल्या स्वभावाबद्दल काशीताई कडून खूपदा ऐकलं होतं. ते दिसयलाही सुंदर होते. त्यामुळे जे झालं ते खरं तर माझ्या मनासारखंच झालं होतं. पण मला काही बोलणंच शक्य नव्हतं. जे जे होत होतं ते निमूटपणे स्वीकारवंच लागणार होतं. अन ते मी स्वीकारत गेले.

मग ठरल्या दिवशी माझं लग्न झालं. आपल्या लग्नात नेमकी काशीताईच नाही हयाची मला खूप हळहळ वाटत होती. एकूणच तिच्या बद्दल खूप वाईट वाटत होतं, पण काहीच ईलाज नव्हता. अन मग पुढे 18 वर्षांनंतर दादांच्या मोठ्या मुलीच्या लग्नात ती आली तेव्हा आमची भेट झाली. तेव्हा आम्ही एक शब्दही न बोलता एकमेकांच्या गळयात गळा घालून भेटलो. एव्हाना माझीही मुलं मोठी झाली होती. संसार सुखाचाच चालला होता. पुढे ताईचं नेहमी माहेरी येणजाण सुरू झाल्यावर बरेच वेळा आमची भेट व्हायची. पुढे केव्हातरी ताईच्या त्या दीरांनी लग्नच केलं नाही असं कळलं त्याक्षणी मनात कुठंतरी दुखलं. मग वाटलं जे जे ज्याच्या दैवात असतं ते ते त्याला निमूटपणे स्वीकारवंच लागतं.

# लीलाधर

म्हणतात ना कर्ता करविता ईश्वर असतो. त्यानं आपल्या नशिबी जे लिहलंय तसं तसं घडत जातं. अन ते ते आपण स्वीकारत जायचं. आता माझंच पहाना. मी आजीवन अविवाहित राहिलो, ब्रम्हचारी राहिलो. मला जेव्हा वहिनींच्यामाहेरची मंडळी लग्नासाठी म्हणून पाहायला आली, तेव्हा सहज-सुलभपणे एका तरुण मनाला जशा गुदगुल्या होतात तशा मलाही झाल्या. पुढे त्यांचा नकार आल्यानंतर अर्थातच वाईट वाटलं. वाहिनीच्या त्या बहिणीला मी अगोदर एकदोनदा पाहिलेलं होतं आणि मला ती आवडलेलीही होती. पण नकार आल्यानंतर वाटलं ती आपल्या नशिबी नाही.आणि गप्प बसलो.वाहिनिनी एकदा विचारलही की मला वाईट वाटलं का म्हणून. मी प्रांजळपणे तिलो हो म्हणालो. अन मग गीतेचं लग्न वहिनींच्या बहिणीच्या दिराशी ठरल्याचं आमच्या मंडळींना कळलं. ते आमच्याकडच्या लोकांना थोडं अपमानास्पद वाटलं. तशात आमचे जीजाजी खुशाल सेठ आमच्या घरी आमच्या बहिणीला घेऊन आले.अन मग त्यांच्या डोक्यात ती गीतेचं हरण करून आणण्याची, पळवून

आणण्याची भयंकर कल्पना आली. त्यांनी ती सगळयांच्या गळीही उतरवली. माझा स्वभाव पहिल्यापासून भित्रा अन निरुपद्रवी होता. मला त्यांची ती कल्पना मुळीच आवडली नव्हती. पण माझं काहीच चालण्यासारखं नव्हतं म्हणून मी गप्पच राहिलो .म्हटलं दादा बघून घेईल काय ते. पण खुशालसेठनी सर्वांना आपल्या योजनेत अडकवलं. अन पुढे ते सर्व घडलं.

जे विधी लीखित होतं, तस-तसं ते घडत गेलं, ह्याशिवाय दुसरं काय म्हणणार? त्या सगळया प्रकारानं खरं म्हणजे मी खूप भांबावून गेलो होतो. पण आत कुठंतरी चांगलंही वाटत होतं. हे असंचं राहो अशी मी परमेश्वराची प्रार्थना करत होतो. पण ते तसं राहणार नव्हतं. ते घडल्यावर पुढे वर्षा-दोन वर्षांनी जेव्हा पुन्हा माझ्या लग्नाचा विषय जेव्हा घरात निघाला तेव्हा मात्र "आता मला लग्नच करायचं नाही " असं मी ठामपणे सर्वांना सांगितलं. मी ते मनाशी पक्क ठरवूनच ठेवलं होतं. त्यात आपलं एकदा लग्न झालेल आहे ही भावना तर होतीच पण जे झालं आणि जशा रीतीनं झालं अन त्याचे आम्हाला भोगावे लागणारे परिणाम ह्या सर्व गोष्टीच्या कुप्रभावानं , लग्न ह्या प्रकारावरून माझं मनच उडून गेलं. अन मी मग ठामपणे हे ठरवलं. माझ्या ह्या निर्णयानं सर्वात जास्त दु:ख वहिनींना झालं. त्यांनी माझी खूप समजूत काढण्याचा प्रयत्न केला. " जे झालं ते झालं. त्यालाच् घेऊन बसू नका. तुमच्या पुढे तुमचं सर्व आयुष्य पडलं आहे. ते असं बरबाद करू नका.

“ असं नाना प्रकारे त्यांनी मला अनेकदा समजवलं. वहिनी बद्दल माझ्या मनात नितांत आदर होता. त्यांची तळमळ मला कळत होती. पण माझा निर्णय ठाम होता. मी त्यांना नम्रपणे प्रत्येक वेळी हेच सांगत होतो की वाहिनी मला तुमची अवज्ञा करायची नाही आहे. पण एवढं सोडून दुसरं काहीही सांगा. मी खूप विचार करून हा निर्णय घेतला आहे. दादानेही मला कधी समजाऊन तर कधी अधिकार वाणीनं सांगून पाहिलं. पण मी कोणाचंच काही ऐकायला तयार नसल्याने हळूहळू ह्या विषयावरची चर्चा एकदाची थांबली. “ कालाय तस्मै नम: “

-----oo-----

संध्याकाळ होत आली, तसा मी माझ्या विचारांच्या तंद्रितून जागा झालो. नदीच्या खडकावरून वाहणाऱ्या निर्मळ पाण्यानं हातपाय अन तोंड धुतलं अन माझ्या खेड्यातल्या माझ्या घराकडे परतायला पाय उचलले..

**समाप्त**

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष

## डॉ. बं. न. जाजू यांचं हे चौथे पुस्तक.

डॉ. बंकटलाल जाजू हे इंजिनियरिंगचे प्राध्यापक. १९६६ पासून ते विविध इंजिनियरिंग कॉलेजांत प्राध्यापक व प्राचार्य होते. त्या काळचे ते IIT Doctorate. पण त्यांचा स्वभाव निगर्वी, मिळून मिसळून रहाण्याचा आणि सर्वांकडून जे जे मिळेल ते ते शिकण्याचा. इंजिनियरिंग आणि संगीतच नव्हे तर व्यवहारज्ञानही. यातून त्यांना मनुष्य स्वभावाचे व त्यातील गुंतागुंतीच्या व्यवहारांचे जे दर्शन घडले ते त्यांनी आपल्या समर्थ लेखणीतून अक्षरी आणले आणि अनेक नियतकालिकांतून प्रसिद्ध केले. त्याचे हे अमूल्य पुस्तक ई साहित्यच्या वाचकांसाठी ते विनामूल्य देत आहेत.

डॉ. बंकटलाल जाजू यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३९), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी

देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३८), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(९), श्याम कुलकर्णी(८), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(३), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (४), प्रवीण दवणे, आर्या जोशी असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।